# प्रकरण तीन

## पशुसंवर्धन विभाग

**3.671 जिल्हा परिषद सेस फंडातून 50 टक्के अनुदानावर सुधारीत जातीच्या म्हैस गट वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10)** - सदर योजनेवर सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद ठाणे यांनी 50 टक्के अनुदानावर सुधारीत जातीच्या म्हैस गट खरेदीवर रक्कम रुपये 1,20,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुदान वितरण आदेशातील अटी आणि शर्तीप्रमाणे योजनेचे लाभ दिल्यानंतर प्रत्येक महिन्याला लाभार्थीच्या नावासह तीन वर्षापर्यंत प्रत्येक लाभार्थींचा आर्थिक प्रगती अहवाल द्यावा असे असतांनाही आर्थिक प्रगती अहवाल प्राप्त झाला नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी 10-2004/ 18103/प्रक्र367/पदुम-4,दिनांक 05/10/2004 परिशिष्ट ब मधील क्रमांक 11 नुसार पशुवैदयकीय अधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करून सद्यस्थिती अहवाल जिल्हा पशुवैदयकीय अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

3) आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे तालुकानिहाय वसूल केलेला लाभार्थी हिस्सा किती व एकूण लाभार्थ्यांना खर्च केलेली रक्कम किती याबाबतचा तपशील उपलब्ध झाला नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.वि./पीरसी1083/सीआर 1074/578,दिनांक 02/07/2013 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना ते सादर केले नाही.

5) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचे मार्गदर्शक सूचना क्रमांक 3 नुसार लाभार्थ्यांची निवड करताना एकूण लाभार्थीच्या 33 टक्के महिला लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक असताना कमी महिला लाभार्थ्याला लाभ दिलेला आहे. 33 टक्के महिला लाभार्थ्यांना लाभ दिलेला नसेल तर इतर लाभार्थ्यांना लाभ न देता उर्वरीत रक्कम जिल्हा परिषद सेस खाती जमा करणे आवश्यक आहे.

**3.672 सेवा शुल्काची रक्कम बळकटीकरणासाठी मंजूर न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद रायगड सन 2014-15 मध्ये सेवाशुल्काची रक्कम मंजूर न केले बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

उपसचिव कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग मंत्रालय मुंबई निर्णय क्रमांक 2010/प्र.क्र.326/ पदुम04,दिनांक 11/10/2010 नुसार जिल्हा परिषदेकडील पशुवैदयकिय दवाखान्यामार्फत जमा झालेल्या सेवा शुल्काच्या रक्कमेपैकी कृत्रिम रेतन कार्याचे सेवा शुल्क वगळून उर्वरीत 100 टक्के ची रक्कम पशुवैदयकिय दवाखान्याच्या बळकटीकरणासाठी उपरोक्त शासन निर्णयातील अट क्र.01 ते 06 नमुद केलेल्या बाबीवर खर्च करण्यात मंजूरी देण्यात आली असून जमा रक्कमेचा विनियोग त्याच आर्थिक वर्षात त्या-त्या पशुवैदयकिय संस्थेसाठी विहीत कार्यप्रणालीचा अवलंब करून करावयाचे निर्देश असतांना पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद रायगड यांनी सन 2013-2014 व 2014-2015 मध्ये जमा झालेली सेवा शुल्काची रक्कम 8,76,985/- + 9,10,872/- एकूण रूपये 17,87,870/- संबंधीत पशुवैदयकिय दवाखान्यासाठी वाटप न करता जिल्हा परिषद लेख्यात शिल्लक ठेवले आहेत. जमा सेवा शुल्काची रक्कम संबंधीत दवाखान्यांना मंजूर न केल्याने संबंधित लाभार्थी दवाखाने उपरोक्त योजनेपासून वंचित राहिले आहेत.

**3.673 औषधे लसी व उपकरणे खरेदी.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषदेकडील पशुसंवर्धन विभागाने जिल्हा परिषद सेस मधून औषधे लसी उपकरणे खरेदी योजना राबविली आहे, व यावर रूपये 44,97,491/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त पशुसंवर्धनविभाग यांच्याकडील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे फलश्रृती अहवाल घेतला नाही, दवाखान्यात शिल्लक औषधांचा साठा विचारात घेऊन औषधांची मागणी करण्यात आली नाही. सदर बाबत साठा नोंदवहीची शिल्लक व भांडारातील शिल्लक यांची पडताळणी करून जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 98 प्रमाणे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणपत्र दिले नाही.

2) पुरवठा करण्यात आलेल्या औषधाची एक्सपायरी तारीख नमुद नाही. तसेच महाराष्ट्र शासन कृषी, पशुसंवर्धन विभाग शासन निर्णय क्रमांक 2010 दिनांक 09/08/2011 नुसार दवाखान्याच्या दर्जा व श्रेणीनुसार औषधे खरेदी करून वाटप करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) औषधे खरेदी त्याच वर्षी वापरणेचा आदेश असतांना विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.674 गोपालकांना स्वच्छ दुध निर्मितीसाठी 75 टक्के अनुदानावर साहित्य पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** जिल्हा परिषद रायगड च्या पशुसंवर्धन विभागाकडील गोपालकांसाठी स्वच्छ दुध निर्मितीसाठी 75 टक्के अनुदानावर 10 लीटर क्षमतेची प्लॉस्टीक किटली 13 लीटर क्षमतेची प्लॉस्टीक बादली व 10 लीटर क्षमतेची घमेले व गाळणी पुरविण्याची योजना जिल्हा परिषद सेस मधून राबवून यावर रूपये 8,49,499/- खर्च केलेला आहे. लाभार्थी निवडीचे निकष याची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

1) लाभार्थ्यांचे प्रस्ताव उपलब्ध झाले नाहीत.

2) खरेदी करण्यात आलेले संचाचे ISI प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही व संचातील गाळणी सोडून इतर साहित्य 10 Kg वजन सहन करणारी व 3 वर्ष टिकेल अशी असली पाहीजे याबाबतचा तांत्रिक अधिकाऱ्याचा दाखला उपलब्ध झाला नाही.

3) लाभार्थ्यांचे मास्टर रजिष्टर व चलन नस्ती सोबत नाही.

4) मागील वर्षात मंजूर केलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही लेखापरिक्षणास सादर न केल्यामूळे या वर्षात लाभार्थ्यांना परत लाभ दिला किंवा नाही, याची तपासणी लेखापरिक्षणास करता आली नाही.

**3.675 अनुसुचित जाती / जमातींच्या लोकांना विशेष घटक योजनेतून शेळी मेंढी गट पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** जिल्हा परिषद रायगड यांनी अनुसुचीत जाती/जमाती लाभार्थ्यांसाठी शेळी मेंढी गट पुरवठा विशेष घटक योजनेतून 75 टक्के अनुदानावर योजना राबलेली आहे यासाठी एकूण रूपये 5,74,176/- खर्च करण्यात आलेला आहे. ही योजना राबवतांना खालील प्रकारच्या त्रूटी निदर्शनास आलेल्या आहेत.

1) लाभार्थ्यांचे 25 टक्के रक्कमेबाबत 16 लाभार्थ्यांचे एकूण रूपये 1,91,392/- उभारणे बाबतची कागदपत्र् लेखापरिक्षणास पहावयाला मिळाली नाहीत.

2) लाभार्थी दारिर्दय रेषेखालील असल्याबाबत दाखले लेखापरिक्षणास तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

3) लाभार्थ्यांनी मागील 5 वर्षात लाभ न घेतल्याबाबत दाखला पहावयास मिळाला नाही.

4) गटातील 10 शेळया व 1 बोकड खरेदी केल्याबाबत समितीचा दाखला पहावयास मिळाला नाही.

5) शेळी गटाची लाभार्थींच्या घरी जावून 100 टक्के पडताळणी करण्याबाबतचा अहवाल लेखापरिक्षणास पहावयास मिळाला नाही.

**3.676 कामधेनू योजनेंतर्गत औषध खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत पशुसंवर्धन विभागाने सन 2014-2015 या आर्थिक वर्षात कामधेनू योजनेंतर्गत औषध खरेदी करण्याकरीता प्रमाणक क्रमांक 1226, दिनांक 31/03/2015 अन्वये रक्कम रुपये 12,10,624/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचा दरकरार क्रमांक जा.क्र.डीडीटी/326/ 1199/2014/प.स./12/औंध, पुणे दिनांक 25/11/2014 नुसार कामधेनू योजनेंतर्गत औषधी खरेदी करण्याचे पुरवठा आदेश क्रमांक रजिप/पशुसंवर्धन/डी-6/3265,दिनांक 15/12/2014 नुसार पुरवठादारास देण्यात आले होते. दरकरारातील अट क्रमांक 12 अन्वये पुरवठादाराने मालाचा पुरवठा 60 दिवसांच्या आत न करता दिनांक 20/02/2015 रोजी एक आठवडा विलंबाने केलेला आहे. प्रति आठवडा 0.50 टक्के इतका दंड म्हणजेच रुपये 6,053/- देयकातून कपात न करताच प्रदान करण्यात आलेले आहे.

2) दरकरारातील अट क्रमांक 2 नुसार पुरवठा केलेल्या औषधांची गुणात्मक व संख्यात्मक तपासणी होऊन 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठ्याची रक्कम प्रदान करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.677 फॅट मशीन पुरवठा करणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद सिंधुदुर्ग पशुसंवर्धन विभागाकडील फॅट मशीनचा पुरवठा करणे योजनेचे लेखे तपासले असता अनियमितता खालीलप्रमाणे आढळून आल्या.

1) या योजनेसाठी ज्या लाभार्थ्यांची निवड केली याबाबत योजनेचा लाभ घेण्यासाठी किती लाभार्थीनी प्रस्ताव सादर केले याबाबत विभागाने नोंदवही ठेवलेली नसल्याने लाभार्थी निवडीची पडताळणी करता आली नाही.

2) तोंडवली दुग्ध विकास सह सोसायटी कुडाळ व रामेश्वर सह. दुग्ध व्यवसाय संघ कुडाळ यांनी 100 लिटर प्रति दिन इतके दुध संकलन करत असलेबाबतचे दाखले कार्यनस्तीत नसताना योजनेचा लाभासाठी निवड कशी काय करण्यात आली.

3) विभागाने मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

4) ज्या लाभार्थ्यांना (संस्थांना) फॅट मशिनचा लाभ देण्यात आला आहे त्यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्रे घेण्यात आली नाहीत.

5) पुरवठा दाराकडून फॅट मशिन सुस्थितीत पोहोच केलेबाबत तसेच चाचणी अहवाल नाही.

6) लाभार्थींची निवड यादी लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाली नाही.

**3.678 संकरित / देशी गोवंशाच्या कालवडी व सुधारीत/देशी म्हशींच्या पारडयांची जोपासना करण्यासाठी अर्थसहाय्य करणे.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा परिषद सिंधुदुर्ग कडील पशुसंवर्धन विभागाकडील सन 2014-2015 चे लेखापरीक्षणादरम्यान संकरीत / देशी गोवंशाचा कालवडी व सुधारीत देशी म्हशींच्या पारडयांची जोपासना करणेसाठी अर्थसहाय्य करणे या योजनेचे लेखे तपासले असता खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) एका कुटुंबातील एका कालवड / पारडीसाठी सदर योजनेंतर्गत लाभ देणेचा असताना खालील नमुद लाभार्थ्यांना एका पेक्षा जास्त जनावरासाठी लाभ का देण्यात आला ? श्री.दुमिंग बेन्तू फर्नांडिस, श्री.राजन बाळकृष्ण मोरे, श्री.जगदीश जयसिंग पवार, श्री.सतिश विश्वास मोरे, श्रीम.स्नेहा सुर्यकांत मुद्रस, श्री.भास्कर सिताराम मांजरेकर, श्री.अनंत आत्माराम कोरगांवकर, श्री.भगवान नारायण हुले

2) योजनेच्या अटी शर्तीनुसार एकूण लाभार्थ्याच्या 30 टक्के महिला लाभार्थी निवडणे आवश्यक होते. मात्र 25 स्त्री लाभार्थीची निवड केलेली आहे. त्यामुळे एकूण लाभार्थी निवडीच्या 9 टक्के आहे.

3) एकूण लाभार्थ्यांच्या 3 टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असणे आवश्यक असताना अशा लाभार्थ्यांचा निवडीमध्ये समावेश नाही.

4) सदर योजनेंतर्गत कालवडीचा / पारडीचा 3 वर्षांकरीता विमा उतरविणे आवश्यक असताना बहुतांश लाभार्थींनी तो उतरविला नाही. उदा. जयसिंग कृष्णा पवार, राहणार खांबाळे, ता. वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग.

5) निवड केलेले लाभार्थी हे अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक व भूमीहीन शेतमजूर असलेबाबतचे प्रमाणपत्र कार्यनस्तीत नाही.

उदा. 1) श्री. अजित रघुनाथ राणे, राहणार कसाल, ता. कुडाळ  2) श्री. बाळकृष्ण गोविंद राऊळ, राहणार परुळे, ता.वेंगुर्ला.

6) निवड केलेल्या बहुतांश लाभार्थ्यांच्या प्रस्तावासोबत ग्रामपंचायतीचे शिफारस पत्र नाही.

उदा.1) श्रीम. स्नेहा सूर्यकांत मुद्रस, राहणार उंबर्डे, ता. वैभववाडी. 2) श्री.संतोष संभाजी पाटील, राहणार कुसूर, ता. वैभववाडी.

### 3.679 कामधेनू ग्राम दत्तक योजना औषधे व साहित्य खरेदी बाबत.

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पशुसंवर्धन विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात कामधेनू ग्राम दत्तक योजना औषधे व साहीत्य खरेदीसाठी एकूण रुपये 2,06,55,135/- खर्च करण्यात आल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र स्टेट को. ऑफ कंझ्युमर्स फेडरेशन, नाशिक यांचे पत्र क्रमांक 191,दिनांक 07/11/2014 अन्वये सिडीफायर प्रति लिटर 250 व डिकंपोस्ट कल्चर प्रति किलो 75/- रूपये असे कळविल्याप्रमाणे खेरदी केली आहे. सदरची खरेदी 11,79,900/- रुपयाची आहे. शासन स्तरावर दर कराराची खात्री न करता शासन निर्णय दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय दिनांक 16/07/1993 नुसार निविदा न मागविता कझ्युमर फेडरेशन यांचेकडील पत्रानुसार खरेदी केलेली आहे.

2) महाराष्ट्र मार्केटींग फेडरेशन मुंबई यांचे पत्र क्रमांक 155, दिनांक 17/12/2014 नुसार गुंडाळी फळा प्रतिनग रुपये 663/- व माहितीपर व्हिडीओ सीडीज प्रतिनग रुपये 297/- नुसार रुपये 8,71,956/- साहित्य खरेदी केले. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 व शासन निर्णय दिनांक 16/07/1993 नुसार निविदा न मागविता खरेदी केले आहे.

3) आयुक्त, पशुंसवर्धन पुणे यांचे कडील भावबंद करार आदेशातील अट क्रमांक 12, नुसार 60 दिवसानंतर उशिराने पुरवठा झाल्यास संबंधित निवीदा धारकाकडून मागणीच्या 1 लक्ष रुपये एकुण किमतीच्या 1 टक्का व एक लक्ष रुपयां वरील एकूण किंमतीच्या 0.50 टक्के प्रति आठवडा याप्रमाणे विलंब शुल्क आकारणी करण्यात यावी. काही औषधे 60 दिवसाच्या मुदतीपेक्षा उशिराने प्राप्त झालेली असतांना विलंब शुल्क आकारणी केलेली नाही. तरी आता संबंधित पुरवठा दाराकडून विलंब शुल्काची रक्कम रुपये 96,113/- वसुल करण्यात यावी.

4) अ.क्र.2,4,12,13,17 ते 19 व 21 या औषधांचे चाचणी अहवाल प्राप्त केलेले नाही. महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक डिआयएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4,दिनांक 05/03/2010 मधील परिच्छेद 13 नुसार औषधांची गुणवत्ता तपासणी करून देयकाची अदायगी करणे आवश्यक आहे. तरी वरील औषधांचे चाचणी अहवाल प्राप्त नसतांना रकमा अदा केले बाबत खुलासा करावा.

5) अनुक्रमांक 1 ते 10, 14 व 19 या वस्तू / साहित्य कधी प्राप्त झाले याबाबत देयकाच्या मागे व साठा नोंदवहीत दिनांक नमुद केलेले नाहीत. तसेच अनुक्रमांक 11 ते 13 व 15 ते 18, 20 ते 23 ही औषधे दिनांक 01/04/2015 ते 28/06/2015 या दरम्यान प्राप्त झालेली असतांना खर्च मात्र दिनांक 31/03/2015 रोजी नोंदविला आहे. तरी साहित्य प्राप्त नसतांना खर्च कसा नोंदविला याचा खुलासा करावा.

6) अनुक्रमांक 3,15,16,20,22,23 या औषधाचा चाचणी अहवाल प्राप्त न करता खर्च नोंदविण्यात आला.

7) आयुक्त, पशुसंवर्धन पुणे यांचेकडील पत्र क्रमांक एफवायपी-12(13)/सी आर-940/ (भाग-3)/2013 पसं-06,पुणे 1,दिनांक 03/08/2013 अन्वये कामधेनू दत्तक ग्रामयोजने अंतर्गत प्रसिध्दी व प्रचार या बाबीखाली उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून पोस्टर, बॅनर, फ्लेक्स बोर्ड, घडी पुस्तिका, हॅण्ड बील्स, कॅलेण्डर, छपाई पत्रके या सर्व प्रकारच्या छपाई साहित्यावर फक्त रुपये 4,000/- या मर्यादे पर्यंतच खर्च करण्यात यावा, असे आदेश असताना मुख्यालय स्तरावरील रुपये 17,04,614/- व वित्तप्रेषणाव्दारे रुपये 10,90,000/- असा एकुण रुपये 27,94,614/- खर्च झाला आहे. मार्गदर्शक सुचने प्रमाणे प्रती गाव रुपये 4,000/- खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार 218 गावांसाठी रुपये 8,72,000/- खर्च अनुज्ञेय आहे. तथापि या बाबींवर 27,94,614/- रुपये खर्च झाला आहे. विहीत मर्यादेपेक्षा रुपये 19,22,614/- जादा खर्च झाला आहे.

**3.680 कामधेनु दत्तक ग्राम योजनाबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** कामधेनु दत्तक ग्राम योजनासाठी रक्कम रुपये 14,19,957/- इतका खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदीचा प्रस्ताव तयार करतांना नंदुरबार जिल्हयातील सर्व तालुक्यांना औषधी व वैरण मागणी प्रस्ताव नस्तीसोबत आढळून आला नाही.

2) सदर योजनेतून खरेदी केलेली औषधे मार्गदर्शक तत्वानुसार सदर औषधांचा गुणवत्ता तपासणीस शासनाचा दिनांक 5/3/2010 चा निर्णयातील मुद्दा क्रमांक 13 प्रमाणे प्रत्येक बॅच ची गुणवत्ता अन्न व प्रशासन विभागाकडील मान्यतेप्राप्त प्रयोगशाळेकडून करुन घेणे आवश्यक असतांना गुणवत्ता चाचणी अहवाल दप्तरी नस्ती सोबत दिसुन आला नाही. म्हणून लेखापरिक्षणात गुणवत्तेची औषधी होती याची खात्रा करता आली नाही.

3) सदर योजना राबवित असतांना मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार यांनी कामधेनु दत्तक योजना संबंधित तालुक्यात राबवित असतांना कुठल्याही शिबीरात भेट दिसुन येत नाही. तसा अहवाल नस्तीसोबत दिसुन आला नाही. म्हणून शासनाची कामधेनु दत्तक योजना परिपुर्ण सफल झाली की नाही याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही.

**3.681 कुक्कुट पालन कर्ज वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** कुक्कुट पालन कर्ज वसुली थकबाकी रक्कम रुपये 6,76,000/- वसूली केलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

राष्ट्रीय सहकार विकास निगम नवी दिल्ली पुरस्कृत कुक्कुट पालन संस्थांकडील कर्ज व्याज व दंड व्याज वसुली बाबतचा पशुसंवर्धन नाशिक विभागातील नंदुरबार येथील इंदिरा महिला कुक्कुटपालन सहकारी संस्था नंदुरबार (संस्था चालु) मार्च 2015 अखेर थकबाकी रक्कम रुपये 1,80,92,000/- आणी कै.सोयराबाई कुक्कुटपालन सहकारी संस्था मु. पो. बलवंड ता. जि. नंदुरबार (संस्था बंद) रक्कम रुपये 25,84,000/- थकबाकी आहे.

एकुण 2,06,76,000/- थकबाकी दिसुन येते. वारंवार परिच्छेद नोंदवुन देखील अद्याप पावेतो वसुली केलेली नाही.

**3.682 अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे अनुदानाचे मुल्यनिर्धारण केलेले नाही.

2) शासन निर्णय क्रमांक जि.प.अ/200/प्र.क.52/पदुम-3, दिनांक 14/01/2004 अन्वये जिल्हा परिषद व शासन यांच्यातील येणे देणे रकमा निश्चित करुन आयुक्त, पशुसंवर्धन यांनी अनुदानाचे मुल्यनिर्धारण करण्याची कार्यवाही केलेली नाही.

**3.683 आदिवासी क्षेत्राबाहेरील दुधाळ जनावरांना खाद्य अनुदान**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक पंरास/1091/ प्र.क्र.921/34,दिनांक 31/07/1991 अन्वये योजना राबवितांना योजनेचे वेळापत्रक निश्चित केले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, समाज कल्याण व महिला बाल कल्याण विभाग, यांचे अर्ध शासकीय पत्र संकीर्ण-10/2013/प्र.क्र.54/पदुम-4, दिनांक 28/02/2003 अन्वये वैयक्तिक लाभार्थीच्या योजना राबवितांना 33 टक्के महीला लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446 वित्त-9,दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ठ "इ" नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना हाती घेतांना व राबवितांना पाळावयाचे वेळापत्रकाबाबत स्पष्ट आदेश दिले आहेत. तथापि विभागाने कार्यान्वित केलेल्या योजनेकरिता नमूद वेळापत्रकाचे पालन केले नाही.

4) वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ दिल्यानंतर अधीकाऱ्यांमार्फत पहाणी करुन लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली, याचा अहवाल सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) पंचायत समितीकडून अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करणेत आले नाही.

**3.684 पशुसंवर्धन शासकीय निधी 2403 या लेखा शीर्षा अंतर्गत सन 2013-14 मधील अखर्चित वेतनेतर अनुदान शासन जमा न करता सन 2014-15 मध्ये नियमबाह्यपणे वितरीत करून खर्च केले बाबत व काही रक्कम अखर्चित ठेवलेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद पुणे अंतर्गत पशुसंवर्धन विभाग यांनी त्यांचेकडील 2403 या शासकीय निधीच्या लेखाशिर्षांतर्गत अखर्चित वेतनेतर अनुदान रक्कम रूपये 24,70,457/-शासन जमा न करता सन 2014-15 मध्ये नियमबाह्यपणे मुख्यालय व पंचायत समिती स्तरावर वितरीत करून खर्च केले बाबत व काही रक्कम अखर्चित ठेवलेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1008/प्र.क्र.128/अर्थोपाय दिनांक 06/06/2008 अन्वये अखर्चित निधी खर्च करण्याची कार्यप्रणालीचे पालन न करता नियमबाह्यरित्या अनुदान वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक अआर-2008/प्र.क्र.3488/हस्ता/अभि/वित्त-2,दिनांक 28/04/2011 अन्वये जिल्हा परिषदेकडील आस्थापना व आस्थापनेतर अखर्चित निधी शासन खाती भरणे बाबत जिल्हा परिषदांनी मार्च 2010- नंतर व त्यापुढील प्रत्येक वर्षा अखेर जिल्हा परिषदेकडील अखर्चित वेतन व वेतनेतर निधी नियमानुसार शासनाच्या संबंधित विभागास व संबंधित प्रशासकीय विभागास नियमाप्रमाणे पाठवावा व ज्या जिल्हा परिषदांकडून ही कार्यवाही नियमितपणे केली जाणार नाही त्यासाठी त्या जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल असे असताना खाली नमुद केल्याप्रमाणे 2403 पशुसंवर्धन, संचालन व प्रशासन आस्थापना, जिल्हा परिषद कार्यालय या लेखाशिर्षांतर्गत रक्कम रूपये 24,70,457/- सदर परिपत्रकाप्रमाणे सन 2013-14 चे अखर्चित अनुदान शासनाच्या संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करून जुलै 2014 च्या पहिल्या आठवड्यात ग्रामविकास विभागास व संबंधित विभागास अखर्चित अनुदान शासन जमा केले बाबतचा अहवाल सादर करणे बंधनकारक असताना पंचायत समिती व मुख्यालय स्तरावर अनुदान नियमबाह्यरित्या वितरीत केले आहे.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-10.2/प्र.क्र.128/अर्थोपाय,दिनांक 26/09/2005 नुसार 31 मार्च पर्यंत निधी मुक्त करून घेवून शासनाच्या तिजोरीबाहेर ठेवण्यात येवू नये असे स्पष्ट केले असताना अखर्चित निधी रूपये 24,70,457/- एवढा निधी आस्थापना विषयक बाबींचा असून तो शासनाला न

भरता जिल्हा परिषदेच्या शासनाकरिताच्या बॅक खाती किंवा त्याची मुदतठेव ठेवून रक्कम अडकवून ठेवला असल्याने त्यावरील व्याजासह रक्कम शासन निधीतून बाहेर ठेवून अनियमितता झालेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1009/प्र.क्र.66/कोषा प्र.5,दिनांक 15/01/2010 नुसार योजनांचे नियोजन नसेल तर निधी शासन लेख्यातून आहरित करून संस्थेच्या बॅक खाती ठेवण्यात येवू नये असे स्पष्ट आदेश असताना सन 2013-14 मधील निधी आहरित करून ठेवलेला होता.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम क्रमांक 39 परिशिष्ट 4 विभाग अ सामान्य तत्वे यामधील नमुद असलेल्या तरतुदीचा भंग करून अनुदान नियमबाह्यरित्या वितरीत केले, खर्च केले व काही रक्कम अखर्चित ठेवली.

5) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांच्या दिनांक 06/09/2014 च्या आदेशान्वये उपरोक्त नमुद वितरण आदेशाव्दारे रक्कम रूपये 24,70,457/- वितरीत केलेली आहे. मात्र त्याच लेखाशिर्षा खाली जिल्हा परिषद, पुणे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 च्या नियम 66(अ) नुसार ठेवण्यात आलेल्या कमी व जास्त जमा खर्चाची कारणे यामध्ये रक्कम रूपये 24,69,000/- एवढी त्या-त्या लेखाशिर्षाखाली दर्शविलेली आहे. सदर रक्कमेमध्ये रूपये 1,457/- एवढी तफावत आढळून येत आहे.

**3.685 आकृतीबंधात पद मंजूर नसताना अदा केलेल्या वेतनाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** जिल्हा परिषद, पुणे पशुसंवर्धन विभाग कडील आकृतीबंधात वाहनचालकाचे एक पद मंजूर असताना एका वाहनचालक पदाचे जादा वेतन रक्कम रुपये 1,42,362/- अदा केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक एपीपी-1001/ प्र.क्र.960/आस्था-8,दिनांक 27/06/2003 अन्वये मंजुर आकृतीबंधात वाहनचालक पदासाठी वाहनांचे संख्येइतकेच वाहन चालक मंजुर आहेत परंतू सदर विभागाकडे एकच वाहन सेवेत असून वाहचालकांची दोन पदे कार्यरत आहेत. सदर अतिरीक्त वाहनचालकाचे पदाबाबत मंजुरी आदेश उपलब्ध नाहीत. तसेच अतिरिक्त पदाबाबत झालेल्या कार्यवाही बाबत अभिलेख उपलब्ध झाले नाहीत. सदर अतिरीक्त पदाच्या वेतनाचा खर्च रक्कम रुपये 1,42,362/- विभागाने केला आहे.

**3.686 मैत्रीण योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** जिल्हा परिषद, पुणे पशुसंवर्धन विभाग यांचेकडील जिल्हा निधीमधून रक्कम रुपये 24,88,015/- खर्चाच्या शेळीगट वाटप या मैत्रीण योजनेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेत 25 टक्के लाभार्थी हिस्सा भरल्याचे चलन नस्तीस जोडलेले नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर-1633/57,दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जिल्हा परिषदेकडे जमा केल्याशिवाय लाभार्थ्यांना लाभ देवू नये अथवा साहित्याची खरेदी करू नये असे असताना लाभार्थी हिस्सा रक्कम जमा केले बाबत नमुना नंबर 10 च्या पावत्या तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 42,50 व 57 अन्वये नमूना क्रमांक 4 नुसार, लाभार्थी हिश्याची रक्कम जमा झाल्याचे चलन दप्तरी नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व महाव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवयो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार उस्मानाबादी/संगमनेरी जातीचा शेळीची आधारभूत किंमत प्रती शेळी रुपये 6,000/- तर बोकडाची आधारभूत किंमत रुपये 7000/- व स्थानिक जातीच्या शेळीची आधारभूत किंमत रुपये 4000/- व बोकडाची किंमत रु.5000/- ठरविण्यात आलेली आहे. तथापि पशुसंवर्धन विभागाने 11/11/2011 च्या शासन निर्णयांतील सूचनांचा विचार न करता एका शेळी गटाची किंमत 30,000 + 5.75 टक्के

दराने विमा + 10.03 टक्के दराने सेवाकर (30,000+1,725+3,009) असे एकूण 34,734/- एका शेळी गटाची किंमत होते त्यापैकी 75 टक्के म्हणजे 26050 रुपये प्रमाणे 104 गटांचे वाटप केलेले आहे. त्याऐवजी स्थानिक शेळींची किंमत विचारात घेता 5 शेळी रुपये 4000 प्रमाणे 20,000+5.75 टक्के विमा + 10.03 टक्के सेवाकर (20,000+1,150+2,006) असे एकूण 23,156/- चे 75 टक्के 17367/-प्रमाणे 104 लाभार्थ्यांना 17,367/- इतकीच रक्कम गरजेची होती. स्थानिक शेळ्या खरेदी केल्या असल्या तर जास्तीच्या 39 लाभार्थ्यांना लाभ देता आला असता तसे न केल्याने 39 लाभार्थी लाभापासून वंचित राहिले आहेत.

3) उपयोगीता प्रमाणपत्रे लेखापरीक्षण कालावधीपर्यंत उपलब्ध झाली नाहीत.

4) वाटप अनुदान रक्कम रूपये 24,88,050/- असून कमी-जादा खर्चाचा तक्त्यावरुन योजनेवरील खर्च रक्कम रूपये 23,68,022/- असल्याचे दिसते. म्हणजेच सर्व तालुक्यांनी मिळून वाटप अनुदानातील रक्कम रूपये 1,20,028/- एवढी अखर्चित ठेवलेली आहे.

**3.687 कामधेनू दत्तक ग्रामयोजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, साताराने कामधेनू दत्तक ग्राम योजनेसाठी रक्कम रुपये 1,05,95,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकूण प्राप्त अनुदानापैकी रक्कम रुपये 72,908/- कमी खर्च झाला आहे. सदर रक्कम अखर्चित राहिल्याच्या कारणासह शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे.

2) पंचायत समिती स्तरावर खर्च करावयाची वर्ग रक्कम रुपये 41,40,000/- ही 1 ते 6 बाबींकरीता खर्च करावयाची आहे व विनीयोग दाखले घेतले नाहीत. यास्तव खर्च योग्य झाल्याचे व अखर्चित अनुदान परत केल्याची पुर्तता दाखवणे आवश्यक आहे.

3) प्रशासकीय मान्यतेनुसार 300 किंवा त्यापेक्षा जादा पैदास सक्षम जनावरांची संख्या असणाऱ्या गावांची निवड करावी व कमी असल्यास शेजारील गावाचा समावेश करुन योजना राबविणे आवश्यक आहे. तथापि पशुवैद्यकीय दवाखाना पुसेगांव अंतर्गत निवडलेल्या रेवलकरवाडी गावाची पैदास सक्षम जनावरांची संख्या 179 असून निकषापेक्षा कमी जनावरे असल्याने औषधे व अन्य बाबींचा विनीयोग योग्य झालेला नाही.

4) तांत्रिक मंजूरीतील अ.क्र. 7 वर पुरवठादाराचे नावाने बदल हया दुरुस्तीबाबत कारण नमूद करुन मंजूरी घेतली नाही व साक्षांकित केले नाही.

5) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचे मंजूरी आदेश जा.क्र. डीडीडी/313 (भाग 2)/49/2012-13/पंस12,दिनांक 16/01/2013 मधील दरकरार अ.क्र. 3 नुसार गुणवत्ता प्रमणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक असून अ.क्र. 8 नुसार औषधांचे पार्सल कार्यालय प्रमुखांनी दोन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत फोडणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केलेली नसल्याने प्रदान नियमबाहय झाले आहे.

6) दर करारातील अट क्रमांक 15 अनुसार गेल्या तीन वर्षातील पशुरुग्णांच्या आजाराचा आढावा घेऊन औषधांची मागणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नसल्याने औषध खरेदी व वाटप योग्य असल्याचे प्रमाणीत होत नाही.

7) प्राप्त औषधे 1 ते 2 महिने उशीराने वाटप केले आहे. त्यामुळे त्या दरम्यान पशुरुग्ण औषधांशिवाय वंचित राहिले नसल्याबाबत तपशिल उपलब्ध करणे आवश्यक आहे.

8) साठा नोंदवही पहाता Gramin A.D.3 Powder (100gm वजन) पंचायत समिती कोरेगांव यांना 800 नग व पंचायत समिती कराड यांना 3200 नग असे एकूण 4000 नग प्राप्त झाल्याबाबत पोहोच उपलब्ध नसल्याने प्रतिनग रुपये 17.80 प्रमाणे रक्कम रुपये 71,200/- मान्य करता येत नाही.

9) दरकरारातील अटींनुसार पुरवठादारास 45 दिवसांच्या आत रक्कम प्रदान करणे बंधनकारक आहे. तथापि अनुदान प्राप्त असतांना व अन्य पुरवठादाराचे प्रदान केले असतांना सदरचे प्रदान 4 महिने 23 दिवसाने केले आहे. उशीरा प्रदानाचे प्रयोजन स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**3.688 50 टक्के अनुदानावर एकदिवशीय मिश्र पिलांचे गटवाटप करणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सातारा यांनी 50 टक्के अनुदानावर एकदिवशीय मिश्र पिलांचे वाटप या योजनेवर रुपये 14,42,225/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र.क्र.312/पदुम-4,दिनांक 16/09/2010 अनुसार व्यापक प्रसिध्दी देण्यात आली नाही. तसेच लाभार्थी निवडीचे निकष पुर्ण केले नसल्याने 181 लाभार्थ्यांची निवड योग्य असल्याचे प्रमाणित होत नाही.

2) महाराष्ट्र शासन नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो/1007/प्र.क्र.39/ क/1444,दिनांक 16/02/2008 अनुसार जिल्हा परिषदेची प्रशासकीय मान्यता घेणे अनिवार्य असतांना ती घेण्यात आली नाही.

3) अनुदान सन 2013-14 करीता प्राप्त झाले होते. तथापि निधी अखर्चित राहण्यासाठी दिलेले आचारसंहितेचे कारण संयुक्तिक नाही.

4) सन 2013-14 मधील निधी अखर्चित राहिल्याने ग्रामीण जनतेच्या रोजगार निर्मिती व आर्थिक लाभावर परिणाम झाला नसल्याबाबत तपशिल आवश्यक आहे.

5) पशुखाद्याच्या दरकराराची मुदत दिनांक 30/06/2014 ला संपत असल्यामुळे पशुखाद्य खरेदी ऐवजी लाभार्थ्यांच्या खात्यावर 2 हप्त्यात अनुदान वर्ग केले आहे. लाभार्थ्याने खाद्य खरेदी केल्यावरच 100 एकदिवशीय पिले वाटप करुन दुसरा हप्ता वाटप करावयाचा असून BIS मानकाप्रमाणे पोषण मुल्य खाद्य खरेदीच्या नोंदी दप्तरी नाही. त्यामुळे लाभार्थ्याने 50 टक्के रक्कम योग्य बाबीवर खर्च केल्याचे दिसून येत नाही.

6) उपरोक्त दिनांक 16/9/2010 च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्रमांक 20 नुसार पक्षाचे अंडयावर येण्याचे वय व त्यापासून मिळणारे उत्पन्न यांचे अभिलेख नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. तसेच फलश्रृती अहवाल आयुक्त पशुसंवर्धन यांना पाठविला नाही.

7) शासन निर्णय दिनांक 16/09/2010 नुसार एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींना लाभ दिला नसल्याचे नोंदवहीच्या आधारे नियंत्रण ठेवल्याचे आढळले नाही.

8) सहाय्यक आयुक्त, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक साएचके/ पिले पुरवठा/81/2014 दिनांक 05/03/2015 अनुसार 6 फेऱ्यांमध्ये 18,000 पिले पुरवठा निश्चित केला होता. सदर पिले वाहतुकीकरीता निता ट्रान्सपोर्ट यांना प्र.क्र. 431 अन्वये 4 फेऱ्यांकरीता रुपये 21,375/- आदा केले आहेत. त्याबाबत डिलीव्हरी चलन गेटपास अथवा अन्य नोंदी नाहीत. त्यामुळे वेळापत्रकानुसार वाटप झाल्याचे दिसून येत नाही.

9) निता ट्रान्सपोर्ट यांचे बिल क्रमांक 200,दिनांक 26/03/2015 नुसार सातारा, कोल्हापूर सातारा अंतर 285 किलोमीटर दर्शविले असून हा रुपये 18.75 प्रति किलोमीटर दर्शविला आहे. सर्वे ऑफ इंडिया यांचे क्रमांक TB115/62-एउ/1985,दिनांक 23/01/2003 अन्वये मंजूर नकाशानुसार सातारा कोल्हापूर अंतर 123 किलोमीटर म्हणजेच परतीचे अंतर 246 किलोमीटर भरते. त्यामुळे चार फेऱ्यांकरीता 1140-984 = 156 X 18.75 = 2925/- एवढे जादा प्रदान झाले आहे. तसेच सदरचे दर द्रवनत्र वाहतुकीसाठी व टँकर अथवा बंदिस्त टाक्यांद्वारे वाहतुकीसाठी आहेत. त्यामुळे सदर दराने दिलेले वाहतुक आदेश व प्रदान नियमबाहय झाले आहे. परिवहन विभागाकडून अनुज्ञेय दराप्रमाणे परिगणना करुन जादा प्रदान वसुल करणे आवश्यक आहे.

**3.689 योजना राबविलेल्या नसल्याने अनुदान गुंतून राहिले आहे.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभागाचे सन 2014-2015 चे लेखापरीक्षण करताना विविध योजने अंतर्गत प्राप्त अनुदान खर्च व शिल्लक याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेपैकी विशेष घटक योजने अंतर्गत शेळ्या मेंढया गट वाटप योजनेसाठी सन 2014-2015 मध्ये रक्कम रुपये 70,00,000/- प्राप्त असून कोषागारातून रक्कम आहरित करूनही कोणताही खर्च न करता शिल्लक ठेवल्याचे दिसून येते.

2) विशेष घटक योजने अंतर्गत मागील वर्षाची शिल्लक रक्कम रुपये 35,91,007/- असून रक्कम रुपये 8,97,779/- एवढी शिल्लक ठेऊन रक्कम रुपये 27,43,228/- एवढा खर्च केला आहे.

3) शेळया व मेंढ्या गटवाटप योजने अंतर्गत चालू वर्षी रक्कम रुपये 28,00,000/- व मागील वर्षीची शिल्लक रक्कम रुपये 1,37,290/-आहे. परंतु सन 2014-2015 मध्ये सदर योजनेवर कोणताही खर्च केलेला नाही.

4) एकूण विशेष घटक योजने अंतर्गत रक्कम रुपये 1,37,28,297/-अनुदान प्राप्त असून खर्च रक्कम रुपये 27,43,228/- म्हणजे फक्त 20 टक्के खर्च केला आहे.

5) सर्वसाधारण योजना अंतर्गत एकूण प्राप्त अनुदान रक्कम रुपये 6,45,19,725/- असून खर्च रक्कम रुपये 2,16,95,461/- म्हणजेच फक्त 33 टक्के खर्च केला आहे.

वरील अभिपप्राय पाहता एकूण प्राप्त अनुदान रक्कम रुपये 9,52,84,785/- असून खर्च रक्कम रुपये 4,08,15,492/- म्हणजेच फक्त 42 टक्के खर्च केला आहे. एकूण प्राप्त अनुदानापैकी 58 टक्के निधी खर्च न करता गुंतून राहिला आहे.

### 3.690 दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम 100 टक्के अनुदानावर बियाणे वाटप योजनेबाबत.

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पशुसंवर्धन विभागाकडील दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम 100 टक्के अनुदानावर बियाणे वाटप योजना खर्च रक्कम रुपये 8,82,000/- खर्चाची तपासणी करून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मार्गदर्शक सूचना व प्रशासकीय मान्यतेनुसार राष्ट्रीय बियाणे महामंडळ / राज्य बियाणे महामंडळ, इतर शासकीय संस्था, कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ/महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ/पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास मंडळ यांचेकडून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून खरेदी करणे आवश्यक होते तथापि दर मागणी पत्र प्राप्त दर व तुलनात्मक तक्ता नस्तीसोबत नसल्याने मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

2) मुद्रांकित करारनामे केलेले नाहीत. मंजूर लाभार्थी यादी उपलब्ध झाली नाही.

3) नॅशनल सीड्स कार्पोरेशन ने सात तालुक्यांना दिनांक 14/08/2014 पर्यंत बियाणे पुरविले आहे व पंचायत समिती मिरजला दिनांक 12/10/2014 रोजी बियाणे पुरविले असताना उर्वरित दोन तालुक्यांना जुन्या दराने बियाणे पुरविण्यास असमर्थता दर्शविल्याचे पत्र दिनांक 07/10/2014 रोजी दिले आहे ही बाब संयुक्तिक नाही.

4) पुरवठा उशिरा केल्याने दंड वसूल केलेला नाही, तरी दंड रक्कम रुपये 13,230/- वसूल करून दाखवावा.

5) पुरवठा आदेशाप्रमाणे बियाणे न पुरविल्याने कडेगाव व पलूस तालुक्यातील लाभार्थी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

6) पुरवठा आदेशाप्रमाणे बियाणे पुरवठा न केल्याने उर्वरित 2805 किलो बियाणासाठी जादा रक्कम अदा करावी लागण्याची शक्यता असल्याने शासनाचे नुकसान होणार आहे.

### 3.691 राजर्षि शाहू पशुपालक दत्तक योजनेअंतर्गत प्लास्टीक किटल्यांचा पुरवठा

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** राजर्षि शाहू पशुपालक दत्तक योजनेतंर्गत प्लॉस्टीक किटल्यांखरेदी करिता जिल्हा परिषद उपकर निधीमधून रक्कम रुपये 16,15,833/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचयत समिती अधिनियम 1961 मधील कलम 100 प्रमाणे पहिल्या अनुसूचिमधील पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय या शिर्षकाखालील निवडता येणाऱ्या कामांची अनुक्रमांक 14 ते 17 पर्यंत कामे नमुद असून त्यामध्ये किटली खरेदी नमूद नसल्याने नियमबाहय खरेदी केली आहे

2) प्लॉस्टीक किटल्या पुरवठा एजन्सीला सदर देयकापोटी 13,697 नगाचे प्रती नग रक्कम रुपये 156.70/- दराने 75 टक्के अनुदान रक्कम रुपये 16,09,740/- आदा करणेऐवजी रक्कम रुपये 16,12,137/- आदा केल्याने अतिप्रदान रक्कम रुपये 2,397/- संबंधिताकडून वसुल करणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 1068/5क/73/34,दिनांक 20/10/1999 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र446/वित्त- 03, दिनांक 20/06/2008 मधील मार्गदर्शक सूचना, परिशिष्ट 'इ' नुसार वैयक्तीक लाभाची योजना राबविताना वेळापत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच सदरची योजना राबविताना लाभार्थी निवड करण्यापूर्वीच किटल्या खरेदी केलेल्या आहेत. त्यामुळे सदर योजनेची फलश्रुती झाल्याचे दिसून येत नाही.

4) किटल्या वाटपासाठीची संबंधित मंजूर लाभार्थींची यादी पडताळणीस उपलब्ध झाली नाही. लाभार्थी यादी अंतिमता मंजूर नसताना 13,697 नग किटल्यांची खरेदी केल्याने अनियमितता झालेली आहे.

5) किटल्यांचे वाटप यादी पडताळणीस उपलब्ध झालेले नाही.

**3.692 राष्ट्रीय ब्रुसेलॉसीस नियंत्रण कार्यक्रम (केंद्र पुरस्कृत) योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी राष्ट्रीय ब्रुसेलॉसीस नियंत्रण कार्यक्रम (केंद्रपुरस्कृत) योजनेकरिता रक्कम रुपये 3,03,355/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र NCPB/2013-14/581/320/2014 पंस-12 पुणे,दिनांक 27/03/2014 मधील मुद्दा क्रमांक 05 नुसार कोल्हापूर जिल्ह्याची निवड केलेली नसताना रक्कम खर्च करण्याच्या हेतूने कामाचे तुकडे पाडून नियमबाह्य रक्कम रुपये 3,03,355/- ची केलेली खरेदी लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) आयुक्त, पशुसंवर्धन यांचे पत्र क्रमांक NCPB/2013-2014/581/320/2014 पंस-12 पुणे, दिनांक 27/03/2014 मधील मुद्दा क्रमांक 10 नुसार डिस्पोजीबल कॅप्स खरेदीस मान्यता नसताना रक्कम रुपये 50,000/- डिस्पोजीबल कॅप्सची केलेली खरेदी पोटी रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

**3.693 दूध उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी वंध्यत्व निवारण कार्यक्रमाबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) औषध suso calcium vit D3 & B12 परिमाण 27777 रक्कम रुपये 24,99,930/- चा तालुकास्तरावर उशीरा पुरवठा झाल्याने, पुरवठा आदेशातील अट क्रमांक 9 नुसार प्रती आठवडा 0.5 टक्के इतका दंड आकारला नसल्याने, रक्कम रुपये 2,67,152/- इतका कमी दंड आकारला आहे.

2) भावबंद करारातील अट क्रमांक 15 नूसार पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून आवश्यक औषधांची मागणी केलेबाबत, मागणीपत्र उपलब्ध झाले नाही.

3) तालुका उत्तर सोलापूरला औषध SUSPTVI+03+B12 उत्पादन दिनांक 11/2/2015 बॅच नंबर 41501 EXP. DT.12/2015 म्हणजे केवळ नऊ महिने मुदतीचे औषध खरेदी केले आहे.

4) पुरवठा आदेशातील अटीनुसार प्राप्त औषधाचे पार्सल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व अन्य दोन पशु विकास अधिकारी यांच्या समितीसमोर उघडण्यात येऊन त्यातील औषधांची नोंद नोंदवहीत घेण्यात येईल असे नमूद आहे. सदर समितीचे गठन व सदस्य याबाबत तपशिल नाही.

**3.694 कुक्कुट प्रकल्पातील पक्ष्यांकरीता खादय खरेदीतील झालेल्या अनियमिततेबाबत. (शासकीय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत पशुसंवर्धन विभागाने सन 2014-2015 मध्ये कुक्कुट प्रकल्पातील पक्षांकरीता रुपये 1,44,000/- चे खाद्य खरेदी केले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर खरेदीसाठी रक्कम रुपये 48,000/- ची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी एकदाच असतांना तीन वेळा मिळुन रक्कम रुपये 1,44,000/- ची खरेदी करण्यात आली. त्यामुळे प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीपेक्षा रक्कम रुपये 96,000/- जादा खर्च झाला.

2) पुरवठादारासोबत करारनामा करण्यात आला नाही.

3) आयकर अधिनियम 1964 चे कलम 194 (क) नुसार 2% प्रमाणे रक्कम रुपये 2,880/- आयकर कपात केली नाही.

4) 2% प्रमाणे रुपये 2880 VAT ची कपात केली नाही.

5) शासन निर्णय दिनांक 05/03/2010 नुसार पुरवठा झालेल्या मालाची गुणात्मक व संख्यात्मक तपासणी झाल्यानंतरच 45 दिवसाच्या आत पुरवठादाराला प्रदान करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.695 अनुसूचित जातीच्या लाभार्थींनां दुधाळ जनावरांचे 75% अनुदानावर गटवाटप योजनेतील अनियमितता. (शासकिय निधी)**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** जिल्हा परिषद अमरावती येथील सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक 10 दिनांक 02/08/2014 नुसार अनुसूचित जाती योजने अंतर्गत 75 % अनुदानावर रुपये 125 लक्ष ऐवढया रकमेची योजना राबविण्यास मंजुरी देण्यात आली. त्यापैकी आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचेकडुन रुपये 100 लक्ष ऐवढे अनुदान प्राप्त झाले. महाराष्ट्र शासन कृषी ,पशुसंवर्धन ,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक जिवायो -2011/प्र.क 30 क/ पदुम -4 मंत्रालय मुंबई 32 दिनांक 22 नोव्हेंबर 2011 मधील तरतुदी नुसार प्रती लाभार्थी दोन दुधाळ जनावरासाठी रुपये 40,000/- प्रती जनावरा प्रमाणे रक्कम रुपये 80,000/- व विमा व सेवाकराचे मिळुण रुपये 5,061/- असे एकुण रुपये 85,061/- अनुज्ञेय आहेत. त्याचे 75% प्रमाणे रक्कम रुपये 63,796/- प्रति लाभार्थी प्रमाणे 156 लाभार्थ्यांसाठी रक्कम रुपये 99,52,176/- एवढी रक्कम पंचायत समितीला वितरीत करण्यात आली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा स्तरावर लाभार्थीची निवड करण्यासाठी लाभार्थी अर्ज जिल्हास्तरावर निवड समितीकडे पाठविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे लाभार्थ्यांचे अर्ज उपलब्ध झाले नाहीत.

2) 30% महिला व 3% अपंग लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे आढळुन आले नाही.

3) पशुवैदयकीय अधिकारी, पशुविकास अधिकारी, पशुवैदयकीय पर्यवेक्षक सहायक आयुक्त पशुसंवर्धन यांनी दुधाळ जनावर वाटप केलेल्या पशुपालकाच्या घरी जावून 100% पडताळणी करून अहवाल सदर करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची तपासनी केल्याबाबत अहवाल लेखापरीक्षणांस उपलब्ध झाला नाही.

4) आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचे कडील मार्गदर्शक सुचनेनुसार योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने मासीक, त्रैमासीक, वार्षीक व फलनिष्पत्ती अहवाल सादर केल्याचे दिसुन आले नाही.

5) पंचायत समिती कडील उपयोगीता प्रमाणपत्र व भौतीक लक्ष साध्य झाल्याबाबत पंचायत समिती स्तरावरील अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**3.696 सर्वसाधारण जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत पशुवैदयकीय संस्थांना औषधाचा पुरवठा करतांना औषध खरेदी मध्ये झालेल्या गंभीर स्वरुपाच्या अनियमितता. (शासकीय निधी).**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत पशुसंवर्धन विभागाला जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत पशुवैदयकीय संस्थांकरीता औषधी खरेदी करण्यासाठी रुपये 50 लक्ष निधी प्राप्त झाला त्यापैकी रक्कम रुपये 49,99,985/- एवढा निधी खर्च करण्यात आला याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 5436 रक्कम रुपये 12,36,000/- चे मेँ इंडियन जिनोमीक्स प्रा.लि.हैद्राबाद यांचे उपप्रमाणकावर रक्कम रुपये 12,36,000/- एवढी रक्कम प्रदानार्थ मंजुर असुन त्यावर पशुसंवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही तरीही देयक पारित करण्यात आले आहे.

2) औषध खरेदी करतांना पंचायत समिती निहाय मागणी व शिल्लक साठा याचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्याच बरोबर औषधी खरेदीच्या प्रचलीत माणकाप्रमाणे खरेदी करणे आवश्यक होते तथापि त्याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत दस्तऐवज उपलब्ध झाले नाहीत.

3) प्रमाणक क्रमांक 5330 दिनांक 31/03/2015 नुसार मेँ गस्टो फार्मा यांचेकडुन प्राप्त INS DNS ची नोंद साठा नोंदवहित घेण्यात आली नाही. त्यामुळे माल प्रत्यक्ष प्राप्त झाल्याची खात्री करता येत नाही.

4) प्रमाणक क्रमांक 5436 नुसार प्राप्त साहित्यांची नोंद दिनांक 16/03/2015 रोजी म्हणजेच पुरवठा आदेश निर्गमित होण्यापुर्वीच घेण्यात आली आहे.

5) पशुवैदयकीय संस्थाना पुरवठा केलेल्या औषधांचा वापर केल्याबाबतचा तिमाही अहवाल लेखापरीक्षणांस उपलब्ध झाला नाही.

6) आयुक्त पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचे सुचनेनुसार औषधांचे पार्सल कार्यालय प्रमुखांनी स्वताच्या उपस्थितीत व इतर दोन अधिका-यांच्या समक्ष फोडुन मागणी प्रमाणे माल प्राप्त झाल्याची खात्री करणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अधिकृत दस्तऐवज आढळुन आले नाही.

**3.697 पशूवैद्यकीय दवाखान्यांसाठी उपकरणे व साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशूसंवर्धन विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी पशूवैद्यकीय दवाखान्यांसाठी उपकरणे व साहित्य खरेदी साठी सन 2014-15 मध्ये रुपये 24,21,211/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत पशूवैदयकिय दवाखान्याचे बळकटीकरण करण्याकरीता फर्निचर व साहित्य खरेदी रुपये 13,35,561/- ची सुधारीत प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीचे अभिलेखे सादर केलेले नाहीत.

2) साहित्य खरेदी दरकरारानुसार करण्यात आली असून दरकरारात नमुद अट क्रमांक 12 नुसार विलंब शुल्क रुपये 3,998.16 आकारण्यात आलेला नाही.

3) उपकरणे व साहित्य खरेदी करण्यापूर्वी पशुवैद्यीकीय दवाखान्यांकडून मागणी प्राप्त करून खरेदी करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.698 75 टक्के अनुदान दुधाळ जनावरांचे गट वाटप करणे योजनेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पशूसंवर्धन विभाग जिल्हा परिषद अकोला यांनी 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटपा योजनेअंतर्गत सन 2014-15 मध्ये रुपये 31,26,004/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी पशूसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-20112 प्र.क्र.305/पदुम-4 मंत्रालय मुबई,दिनांक 22/11/2011 नुसार 75 टक्के दुधाळ जनावरांचे गट वाटपाबाबत सदर 75 टक्के अनुदान लाभार्थ्यांना अनुज्ञेय असून 25 टक्के रक्कम स्वत: उभारावी लागेल सदर 25 टक्के लाभार्थी हिस्सा भरण्याबाबत कोणतेही अभिलेखे प्राप्त झालेले नाही.

2) सदर योजनेची नस्ती व लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.त्यामुळे शासन निर्णयानुसार योजना राबविली किंवा कसे पडताळणी करता आली नाही.

3) सदर अनुदानाची रक्कम अग्रिमाव्दारे जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी यांचे नावे असून सदर रकमा लाभार्थ्यांस कशा प्रदान केल्या व त्यांच्या पोच पावत्या पोच पावत्या आढळल्या नाहीत.

4) सदर जनावरांची विमा पॉलिसी अद्याप अप्राप्त असून जनावरांचे मृत्यु झाल्यास शासकिय निधीची हानी होऊ शकते.

5) शासन निर्णयातील सुचना क्रमांक 19 दुधाळ जनावरांचे पशुपालकाच्या घरी जाऊन 100 टक्के पडताळणी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) योजनेचा फलश्रृती अहवाल लेखापरीक्षणास सादर केला नाही.

7) समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांनींची यादी लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देणेत आलेली नाही.

**3.699 कामधेनु तथा ओ.टी.एस.पी योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पशूसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद अकोला यांनी कामधेनू तथा ओ.टी.एस.पी.योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे वाटप योजनेअंतर्गत सन 2014-15 मध्ये रुपये 9,99,800/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी पशूसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य विभाग शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र.क्र.340/पशू-4 मंत्रालय मुंबई, दिनांक 30/08/2010 नुसार कामधेनू तथा ओ.टी.एस.पी. योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर ज्या लाभार्थ्यांकडे 3 ते 4 जनावरे आहेत. त्यांना प्रति एक्कर 600/- रुपये मर्यादेत वैरण बियाणांचा पुरवठा करावयाचा असतांना मका 5 किलो पॅकींग मध्ये रुपये 255 तर ज्वारी 3 किलो पॅकींग मध्ये रुपये 240 असून लाभार्थ्यांना 600/- रुपये च्या मर्यादेत बियाणे वाटप कसे करण्यात आले.

2) महामंडळाकडे मका रुपये 42 दराने उपलब्ध असतांना स्वाती सिडस कडून रुपये 51 दराने खरेदी करून रुपये 88,200/- जादा प्रदान करण्यात आले. तसेच संपूर्ण मका खरेदी न करता रुपये 80 प्रति किलो दराने संकरित चारा ज्वारी बियाणे खरेदी करून लाभार्थी संख्या घटवली आहे. पुरवठा पंचायत समिती स्तरावर केल्याने प्रत्यक्षात किती लाभार्थ्यांना लाभ दिला याबाबत कोणतेही अधिकृत अभिलेखे,साठा रजिष्टर आढळले नाही.

3) ओ.टी.एस.पी. योजनेवरील ज्वारी ओ.टी.एस.पी लाभार्थ्यांना वाटप केल्याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

4) सदर बियाणे खरेदी करतांना शेतक-यांची मागणी कोणत्या बियाणासाठी आहे याबाबत आवश्यक अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

5) खरेदी बियाण्याचे डिलेव्हरी मेमो आढळून आले नाहीत.

**3.700 पशुवैद्यकीय दवाखान्यांना औषधी खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद वाशिमचे सन 2014-15 मध्ये औषध खरेदीसाठी रक्कम रुपये 11,17,563/- खर्च नोंदविण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन निर्णय कृषी व पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय मत्स्य व्यवसाय विकास कृ.डी.आय.एस/2009/प्र.क्र.435/पदुभ 04 दिनांक 05/03/2010 मधील अनुक्रमांक 22 नुसार पशुवैद्यकीय संस्थांना पुरवठा केलेल्या औषधाचा वापर केल्याबाबतचा तीमाही अहवाल सादर करणे आवश्यक आहे. परंतु तसे अहवाल लेखा परिक्षणासाठी सादर केले नाही.

2) उपविभागाची औषधांची मागणी कमी असतांना जास्त औषधांची खरेदी करण्यात आली. विभागाने मागणी पत्राची तपासणी न करता खरेदी केल्याचे आढळून येते.

3) महाराष्ट्र शासन निर्णय कृषी व पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय मत्स्य व्यवसाय विकास विभागाचे शासन निर्णय कृ.डी.आय.एस/2009/प्र.क्र.435/पदुभ 04 दिनांक 05/03/2010 नुसार बाब क्रमांक 12 नुसार क्षेत्रीय कार्यालयांनी दर करारान्वये निविदाकाराकडे मागणी डाक पोहोच देय पत्रान्वये नोंदविण्यात आली नाही.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार पुरवठा करण्यात आलेल्या औषधाची गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्याशिवाय देयकाची अदायगी केली जाणार नाही. परंतु गुणवत्ता अहवाल प्राप्त न करताच देयके पारीत करण्यात आली. त्यामुळे औषधे योग्य गुणवत्तेची असल्याबाबत पडताळणी करता आली नाही. करीता सदर अनियमिततेबाबत संबंधितावर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**3.701 एकदिवसीय पिल्ले वाटप निवड यादीत समाविष्ट नसलेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात खादय अनुदान जमा केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** उपरोक्त योजनेवर रक्कम रुपये 4,86,000/- अनुदान खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

या कार्यक्रमात 50 टक्के प्रतिलाभार्थी एक दिवसीय सुधारित कुक्कट पक्ष्यांच्या 100 पिल्लांचे गट वाटप करण्याकरिता रक्कम रुपये 16,000/- अनुदान मंजूर करण्यात येत असून त्यापैकी 50 टक्के अनुदानातुन रक्कम रुपये 8,000/- मर्यादेत प्रतिलाभार्थी पुरवठा करण्यात यावा. उर्वरित 50 टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: उभारुन लागणारा खर्च करण्याबाबतचे निर्देश आहे. ज्या लाभार्थ्यांना पिल्लांचा पुरवठा करण्यात आला नाही. त्या लाभार्थ्यांना खाद्य अनुदान देय ठरत नाही. तरी नियमबाहय प्रदान केलेले खादय अनुदानाची रक्कम रुपये 54,000/- संबधीताकडुन वसुल करण्यात यावी व उचित लेखाशिर्षाखाली जमा करावी.

**3.702 कुक्कुट विकास गट वाघापूर अंतर्गत पक्षी व अंडी विक्रीव्दारे प्राप्त झालेल्या रक्कमेचा कमी भरणा केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** कुक्कुट विकास गट वाघापुर अंतर्गत पक्षी व अंडी विक्रीव्दारे पावती पुस्तकान्वये प्राप्त रक्कमेच्या चलान पडताळणी केल्याप्रमाणे रक्कमा कमी भरण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर योजनेवर रक्कम रुपये 13,300/- खर्च नोंदलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 13 नुसार प्राप्त झालेला सर्व पैसा ताबडतोब बॅकेत भरण्यात येईल असे असतांना रक्कम रुपये 13,300/- संबधीतांनी जवळ बाळगुन निधीचा दुरुपयोग केला आहे. संबधीतावर जबाबदारी निश्चित करून वसुल करावे.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 36 (1) नुसार उघडकीस झालेल्या हानीबाबत विभाग प्रमुख यांनी उचित कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 42 (5) नुसार क्रमांक 4 मध्ये किरकोळ रोखवही ठेवणे आवश्यक असतांना ठेवण्यात आली नाही.

**3.703 पशुसेवा शुल्क रोखपुस्तकातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-15 या वित्तीय वर्षातील (पशुवैद्यकिय दवाखाण्यातील पशुसेवाशुल्क) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे रोखपुस्तक व बँकेतील जमा ची पडताळणी केली असता रोख पुस्तकानुसार सुरुवातीची शिल्लक रक्कम रुपये 36,32,199/- आहे व बँकेतील शिल्लक रक्कम रुपये 59,34,673/- आहे. फरक रक्कम रुपये 23,02,474/- आहे. याफरका बाबत ताळमेळ घेण्यात आलेला नाही.

2) रोखपुस्तक दररोज लिहीणे आवश्यक असताना दिनांक 05/04/2014 ते दिनांक 18/11/2014 व 18/11/2014 ते 06/04/2015 या कालावधीचे रोख पुस्तक लिहीले नाही.

3) सेवा शुल्क निधीचे बचत खाते उघडणे आवश्क असताना चालू खाते उघडण्यात आल्याने व्याजाचे नुकसान झाले आहे.

4) दिनांक 18/11/2014 ते 6/4/15 पर्यत रोखपुसत्कात नोंदी नाहीत तसेच दिनांक 28/10/2014 पासुन पुढील बॅक विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध् करण्यात आले नाही

5) दिनांक 06/04/2015 रोजी रक्कम रुपये 74,01,624/- अखर्चित सेवाशुल्क रक्कम आहे.सदर रक्कम मुदत ठेव खात्यात जमा करणे आवश्क आहे.तशी कार्यावाही न केल्यामुळे व्याजाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे.

**3.704 पशुवैद्यकिय संस्थांना जिवनरक्षक औषधे तसेच शेळया/मेंढयांना जंतुनाशक औषधे पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठादारांनी मागणीच्या 60 दिवसाचे आत पुरवठा करणे आवश्यक असतांना औषध पुरवठा उशिरा केला असतांना देखील दंडाची रक्कम रूपये 5,202/- व रुपये 13,081/- वसुल करण्यात आलेली नाही.

2) ओ.टि.एस.पी. जनजातीक्षेत्र उपाययोजना अंतर्गत येणारी गावे वगळून जिल्ह्यातील इतर सर्व गावातील जनावरांना उपचाराकरीता विनामुल्य औषध पुरवठा करावयाचा असतांना जनजाती क्षेत्रा बाहेरील गावे किती व त्यातील किती जनावरांनवर उपचार केले याबाबत पंचायत समिती स्तरावरून माहिती उपलब्ध झालेली नाही.

**3.705 आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (ओ.टी.एस.पी.) विशेष घटक् योजना (एससीपी योजनेअंर्तत) 75 टक्के अनुदानावार दुभत्या जनावरांचे गट वाटपाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदर योजनेकरीता पशु संवर्धन विभागाने पंचायत समितीस रुपये 32,85,494/- प्रदान करण्यात आले.

1) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4 दिनांक 22/11/2011 ची मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारीकडे लाभार्थी यादी, जनावरांचा तपशील व किमतीसह माहिती उपलब्ध नाही.

2) खरेदी करण्यात आलेल्या दुधाळ जनावरांचा तिमाही अहवाल विभागातर्फे प्राप्त करण्यात आलेले नाही. लाभार्थीनी खरेदी करण्यात आलेल्या जनावरांची नोंद ॲनिमल आयडेटिफीकेशन ॲन्ड रेकॉर्डींग संस्थेकडे केलेली नाही. एकुण लाभार्थीपैकी 3 टक्के अपंग लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेले नाही. लाभार्थीनीं योजनेचा लाभ मिळाल्यानंतर दुग्ध व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र नाही.

3) श्री. सिध्दार्थ मोतीराम कांबळे या लाभार्थी ऐवजी निवडण्यात आलेल्या दुस-या लाभार्थीला लाभ देण्यास विषय समितीची मंजुरी घेतलेली नाही.

**3.706 पशुवैद्यकिय संस्थाना औषधी पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पशुसंवर्धन विभागाने सन 2014-15 मध्ये पशु वैदयकीय संस्थांना औषधी खरेदी करण्याकरीता रुपये 24,69,763/- खर्ची घालण्यात आले.

1) मे. केमेट व्हेट ॲन्ड प्लोअज, अहमदाबाद व मे. व्हेट इंडिया फार्मासिटीकल्स, हैद्राबाद यांच्या देयकातुन एक आठवडा दंडाची रक्कम कमी कपात केल्याने दोन्ही पुरवठाधारकाकडुन अनुक्रमे रुपये 209/- व रुपये 3,513/- वसुलपात्र ठरतात. मे. जाक्सन लेबॉरेटरीज, अमृतसर पुरवठाधारकाने inj zylaxinr udp 2ml 1060 ची मागणी विभागान्वये करुनही पुरवठा केले नसल्याने सदर पुरवठाधारकाचे तक्रार आयुक्त पशुसंवर्धनकडे करण्यात आलेले नाही. शासन दरकरारानुसार पुरवठाधारकाकडुन पुरवलेल्या औषधांचे प्रयोगशाळेकडुन तपासणी अहवाल प्राप्त होण्यापुर्वी पुरवठाधारकास देयक प्रदान केले.

2) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक-डि.आय.एस/2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 अन्वये पशुवैद्यकिय संस्थांना पुरवठा केलेल्या औषधींच वापरल्याबाबत तिमाही अहवाल विभागाने/पंचायत समितीने प्राप्त केलेले नाही.

**3.707 कामधेनु दत्तक ग्राम योजनेसाठी औषधे खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद भंडारा येथील सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजनेकरीता औषधी खरेदीवर रुपये 44,64,060/- चे खर्च दर्शविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, चे कलम 83(3) अन्वये औषधी खरेदीपुर्वी, साहित्याची तपासणी प्रयोगशाळेकडुन तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर 90 टक्के रकमांचे प्रदान करणे आवश्यक आहे. असे असतांना नियमबाहयपणे संपुर्ण 100 टक्के रकमांचे प्रदान केलेले आहे.

2) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक/मागास 1093/प्रक्र 123934, दिनांक 01/09/1999 नुसार साहित्याचे खरेदी तथा वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे आवश्यक असतांना सन 2015-2016 मध्ये साहित्याचे वाटप करण्यात आले होते. त्यामुळे योजनेचा उददेश सफल झाला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, झेडपीए/2008, दिनांक 20/06/2008 अन्वये योजनाचे नियोजनाची अंमलबजावणीकडे दुर्लक्ष करण्यात आले.

4) पशुकेंद्राअंतर्गत वाटप केल्याबाबतचा अहवाल व त्यासंबंधीची उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र आढळुन आले नाही.

5) पशुंच्या आरोग्यात सुधारणा झाल्याबाबत पशुधन अधिकाऱ्याचे अहवाल नस्तीत आढळून आले नाही.

6) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 अन्वये 2 टक्के आयकर व आयकरावर 2 टक्के अधिभाराची परिगनणा करुन पुरवठाधारकाच्या देयकातुन कपात करणे आवश्यक आहे.

**3.708 ओ. टी. एस. पी. योजनेअंतर्गत पशुवैदयकीय केंद्राकरीता औषधे तसेच शेळया मेंढयांना जंतनाशक औषधे खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, भंडारा येथिल सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणास असे निदर्शनास आले की, ओ. टी. एस. पी योजनेअंतर्गत पशुवैदयकीय केंद्राकरीता औषधे तसेच शेळया मेंढयांना जंतनाशक औषधी खरेदीवर रुपये 4,99,981/- चे खर्च दर्शविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक/मागास1093/प्र.क्र.123934, दिनांक 01/09/1999 नुसार साहित्याचे खरेदी तथा वाटप त्याच वित्तिय वर्षात होणे आवश्यक असतांना सन 2015-16 मध्ये साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग झेडपीए/ 2008, दिनांक 20 जुन 2008 अन्वये योजनाचे नियोजनाची अंमलबजावणी कडे दुर्लक्ष करण्यात आले.

3) पशुकेंद्राअंतर्गत वाटप केल्याबाबतचा अहवाल व त्यासंबंधीचे उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र आढळुन आले नाही.

4) पशुंच्या आरोग्यात सुधारणा झाल्याबाबत पशुधन अधिकाऱ्याचे अहवाल नस्तीत आढळून आले नाही.

5) विहीत मुदतीत औषधांचा पुरवठा झाल्याबाबत चलनावर वाहनाचे क्रमांक टाकलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन कृषी पशुसंवर्धन विभाग क्रमांक 102003/13592/प्र.क्र.188,दिनांक 26/11/2008 अन्वये औषधांची विहीत केलेल्या टक्केवारी प्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.709 जिल्हा परिषद सेस फंड योजनेअंतर्गत आकस्मिक उदभवण्याऱ्या रोगाकरीता औषधी खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद भंडारा येथील सन 2014-15 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात जिल्हा परीषद सेस फंड योजनेअंतर्गत आकस्मिक उदभवण्याऱ्या रोगाकरीता औषधी खरेदीवर रुपये 11,84,274/- खर्च नोंदविण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) औषधी खरेदीपुर्वी, प्रयोगशाळेकडुन गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर रकमांचे प्रदान करणे आवश्यक असतांना नियमबाहयपणे संपुर्ण रकमांचे प्रदान केलेले आहे.

2) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक/मागास1093/प्र.क्र.123934 दिनांक 01/09/1999 नुसार साहित्याचे खरेदी तथा वाटप त्याच वित्तिय वर्षात होणे आवश्यक असतांना साहित्याचे वाटप पुढील वित्तीय वर्षात झाल्यामुळे योजनेचे उदिष्ठ सफल झाले नाही.

3) साहित्याचे वाटप, उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन विभाग शासन निर्णय क्रमांक 102003/13592/ प्र.क्र.188, दिनांक 26/11/2008 अन्वये औषधांची विहीत केलेल्या टक्केवारीप्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

**3.710 विषय समितीचा अभ्यास दौ-याबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8)** - सन 2014-2015 मध्ये प्रमाणक क्रमांक 966 दिनांक 26/11/2014 रुपये 40,000/- अग्रीम व प्रमाणक क्रमांक 2718, दिनांक 31/03/2015 रुपये 40,000/- समायोजनबाबत तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीची तपासणी केली असता खाजगी ट्रॅव्हल्सकडुन दरपत्रके मागविलेली नाही.

2) चिंतामणी ट्रॅव्हल्स तिरोडा बिल क्रमांक 53 नुसार वाहन हे गोंदिया येथे 01/12/2014 ला रात्री 10 वाजता परत आल्याचे दिसते. मात्र नोटशिटमध्ये दिनांक 30/11/2014 ला परत आल्याचे दर्शविण्यात आले. तफावतीबाबत खातरजमा होणे आवश्यक आहे.

3) सदर वाहनाचे इंन्सुरन्स असल्याबाबत खातर जमा करता आलेली नाही.

4) प्रवासामध्ये 9 समिती सदस्य, 10 गोपालक व 1 पशुधन अधिकारी असे 20 व्यक्तींनी प्रवास केलेला आहे. मात्र त्यांची नावे नमुद नाही.

5) प्रवासामध्ये जेवण, चहा, नाश्ता वगैरे बाबीवर कुठेच खर्च केल्याचे आढळून येत नाही.

6) संपुर्ण प्रवास 2100 किलोमीटर प्रति किलो 20/- रुपये प्रमाणे रुपये 42,000/- येत असतांना रुपये 40,000/- प्रदान दर्शविण्यात आले.

**3.711 वैरण विकास योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर बर्सीम बियाणे वाटप.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11)** - सन 2014-2015 या वित्तीय वर्षात प्रमाणक क्रमांक 3267, दिनांक 31/03/2015 रुपये 9,97,500/- नॅशनल सिड्स कॉर्पोरेशन लिमीटेड यांना प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदी पुरवठा आदेश दिनांक 22/10/2014 अन्वये बर्सीम बियाणेचे वाटप दिनांक 03/12/2014 ला केले आहे. मात्र पंचायत समिती मार्फत प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वाटपाबाबतचा दस्तऐवज नस्तीत नाही.

2) शासन अंगीकृत फर्मकडून दिलेले दरपत्रकानुसार खरेदी केलेली दिसते. मात्र सदर कालावधीत शासन दरकरार असल्याची खात्री करुन घेतलेली नाही.

**3.712 पशु वैदयकिय संस्थाना औषध पुरवठा करण्यामधील अनियमिततेबाबत**.

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22)** - सन 2014-2015 मध्ये औषध पुरवठयाचे अगोदरच देयकांचे प्रदान झाल्याचे दिसून आले. सदर प्रदान अग्रिम नसून त्याबाबतचा खर्च रोखपुस्तकात दर्शवून प्रत्यक्ष अनुदान अखर्चित असतांना खर्च दर्शविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राप्त अनुदानाची तपासणी केली असता प्रत्यक्षात अनुदान खात्यावर प्राप्त झालेले नसून त्याबाबतचा खर्च दर्शविण्यात आला आहे.

2) साठा पुस्तकाची तपासणी केली असता प्रत्यक्ष औषध पुरवठा हा सन 2016-2017 मध्ये झाल्याचे दिसून येते. त्यामुळे पुरवठ्याच्या आधीच पुरवठादारास रकमेचे प्रदान दर्शविलेले आहे. रुपये 4,95,877/-चा खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

**3.713 पशुवैद्यकिय दवाखान्यासाठी औजारे व हत्यारे खरेदीबाबत (जिल्हा परिषद सेस)**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभागाअंतर्गत सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद सेस योजनेतून प्रमाणकान्वये examination/operation Table unit-1 चे खरेदीवर रक्कम रुपये 1,83,600/- खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिलहा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांची प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी आदेशावर स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

2) मा. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दर करारपत्रातील सुचना क्रमांक 14 प्रमाणे रुपये 10,000/- पेक्षा जास्त यंत्रसामुग्री/उपकरणांचा पुरवठा करतांना तपासणी ही शासकीय अभियांत्रिकी कॉलेज/ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे यांचेकडून करणे आवश्यक असतांना तसे प्रमाणपत्र लेखापरीक्षणात आढळुन आले नाही.

3) दरकरारातील सुचना क्रमांक 16 प्रमाणे अधिनस्त पशुवैद्यकिय दवाखान्याकडुन आवश्यक मागणीपत्र प्राप्त न करताच साहीत्याची खरेदी करण्यात आली.

4) सदर साहित्य प्राप्तीची नोंद साठा नोंदवही क्रमांक 1/2014-15 मधील पृष्ठ क्रमांक 6 वर घेण्यात आली आहे. परंतु, प्रत्यक्षात साहित्य कोणत्या दिनांकास प्राप्त झाले त्याबाबत साठापस्तकात नोंदविण्यात आले नाही.

5) साठा नोंदवही मधील पृष्ठ क्रमांक 6 वर दिनांक 11/03/2015 रोजी 12 नग वाटप केल्याची नोंद आहे. मात्र साहित्य वाटपाबाबत 11 कर्मचाऱ्यांचीच स्वाक्षरी आहे.

6) दर करारातील सुचना क्रमांक 12 प्रमाणे व पुरवठा आदेशातील अटीप्रमाणे पुरवठा आदेशापासुन 60 दिवसाचे आत पुरवठा करावयाचा आहे. पुरवठा आदेश दिनांक 26/06/2014 रोजी दिलेला आहे व वाहतुक भाडे पावती दिनांक 05/09/2014 आहे. म्हणजे साहित्य 72 दिवस उशिराने प्राप्त झाले असल्याने 0.5 टक्के दराने प्रति आठवडा याप्रमाणे विलंब शुल्काची रक्कम रुपये 1,836/- पुरवठादाराचे देयकातून वसुल करावयास पाहिजे होती ती वसुल करण्यात आली नाही.

**3.714 विशेष घटक खेजनेअंतर्गत जनावरांना खाद्य वाटपातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** विशेष घटक योजनेअंतर्गत जनावरांना खाद्य वाटप यावर एकुण रुपये 9,99,975/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. यावर अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) अतिरीक्त आयुक्त, पशुसंवर्धन पुणे यांचे पत्र क्रमांक पशुधन-1मासु/475/2011, दिनांक 22/07/2011 चे मार्गदर्शक सुचनेप्रमाणे लाभार्थी निवड करतांना व्यापक प्रसिध्दी देऊन सर्वात अधिक पात्र लाभार्थीची निवड होण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीची शिफारस घेणे बंधनकारक आहे. पात्र लाभार्थ्याकडून विहीत नमुन्यात अर्ज घेऊन पशुधन विकास अधिकारी (विस्तार) जिल्हा परिषद यांचेकडे सादर करुन त्यास जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी उपआयुक्त यांचेकडे पाठवुन तांत्रिक मंजूरी घेण्या बाबत सुचना आहेत. परंतु अशी तांत्रिक मंजूरी घेतल्याचे आढळुन आले नाही.

2) उपयोगिता प्रमाणपत्र पंचायत समिती आरमोरी, सिरोंचा, वडसा, चामोर्शी, मुलचेरा, धानोरा, गडचिरोली यांचे प्राप्त आहे. परंतु फक्त पंचायत समिती धानोराचे उपयोगिता प्रमाणपत्र वर लाभार्थीचे नाव, गाव, जनावर संख्या ,वाटप खाद्य यासह आहे. इतर पंचायत समिती कडून प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रावर वरिल माहिती नमुद नाही. त्याचप्रमाणे एटापल्ली, भामरागड, कोरची, अहेरी कडुन उपयोगिता प्रमाणपत्र अप्राप्त आहे.

3) विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती/नवबौध्द/ आदीवासी लाभार्थींना शासकीय योजनेव्दारे पुरवठा केलेल्या जनावरांना किंवा लाभार्थीकडे स्व:ताच्या दुधाळ जनावरांच्या भाकड कालावधीसाठी प्रत्येक म्हशीसाठी 225 किलो व गाईयाठी 150 किलो पशुखाद्य 100 टक्के अनुदानावर वाटप करावयाचे आहे. पात्र लाभार्थ्याचे विहीत नमुन्यातील अर्जाचे प्रस्ताव पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समितीकडून प्राप्त न करता लाभार्थी निवडीची प्रक्रिया पुर्ण न करता तसेच सन 2014-15 मध्ये किती भाकड गाई / म्हशी आहेत. किती गाभन गाई

/म्हशी आहेत. याची आकडेवारी पंचायत समितीकडून प्राप्त न करता 215 लाभार्थी करीता रक्कम रुपये 9,99,750/- चे पशुखाद्य खरेदी नियमबाह्य ठरते.

**3.715 शेळी वाटप योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** शेळी वाटप योजनेवर एकुण रुपये रक्कम 10,00,000/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेस ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक, क्रमांक झेडपीए 1012/प्र.क्र. 680 वित्त 1,दिनांक 13/01/2013 नुसार रक्कम रुपये 10,00,000/- ची मंजूरी घेतलेली आहे. परंतु लाभार्थी हिस्सा धरुन योजना रक्कम रुपये 12,50,000/- आहे. त्या रक्कमेस मंजूरी घेतलेली नाही.

2) योजना उदिष्टासह तयार करुन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 1012/प्र.क्र.680 वित्त 1,दिनांक 13/01/2013 नुसार व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नुसार तांत्रिक मंजूरी घेतल्याचे आढळुन आले नाही.

3) शासन निर्णय 19/05/2014 नुसार तरतुद मंजूर झालेली आहे. परंतु तरतुद प्राप्त होणेपुर्वीचे विषय समिती सभा दिनांक 30/04/2014 विषय क्रमांक 8.4 अन्वये मंजूरी घेतली याचा बोध होत नाही. तरी खुलासा व्हावा.

4) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी जुन / जुलै महिन्यात अर्ज प्राप्त करुन एक महिन्याच्या कालावधीत जिल्हा निवड समितीकडून पात्र लाभार्थीची निवड होणे अपेक्षित आहे. परंतु पंचायत समिती वडसा, 369 दिनांक 27/10/2014, आरमोरी 144 दिनांक 18/10/2014, गडचिरोली 455 दिनांक 24/11/2014, चामोर्शी दिनांक 03/11/2014, अन्वये अर्ज प्राप्त झालेली आहे. निवड समितीने दिनांक 08/01/2015 ला लाभार्थी निवडीला मंजूरी दिलेली आहे. यावरुन वेळापत्रकाचे पालन झालेले आहे हे दिसुन येत नाही. जिल्हा स्तरावर प्राप्त होण्याऱ्या अर्जासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवल्याचे आढळुन आले नाही.

5) मार्गर्शक सुचनानुसार 3 टक्के विकलांग लाभार्थींना लाभ दिल्याचे आढळुन आले नाही.

6) श्रीमती रजुबाई काशीराम कुंभारे, उसेगाव व श्रीमती धृपता रामदास कुंभारे, एकलपुर हे दारीद्र रेषेखाली नसतांना सुध्दा निवड झालेली आहे. लाभार्थी निवडीच्या कोणत्या निकषाच्या आधारे यांची निवड झाली हे नमुद नाही.

7) उपयोगिता प्रमाणपत्र पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती आरमोरी/वडसा/चामोर्शीकडून प्राप्त झालेले उपयोगिता प्रमाणपत्र परिपुर्ण नाही. सोबत लाभार्थीचे नाव, गाव, जात, खरेदी जनावराचा प्रकार, रक्कम, लाभार्थी हिस्सा, दिनांक, विमा रक्कम उल्लेखासह नाही. पंचायत समिती उपयोगिता प्रमाणपत्र अप्राप्त आहे.

8) विनियोजनदाखले प्राप्त करुन दप्तरी ठेवल्याचे आढळुन आले नाही.

**3.716 औषध पुरवठा विलंबाने केल्याने विलंब आकार वसुल करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** औषध पुरवठा करणे या योजनेवर एकुण 1,70,14,463/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. विलंबाने औषधी पुरवठा केल्याने विलंब आकार वसुल करणे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंर्वधन, दुग्धव्यावसाय विभाग व मत्स्यव्यावसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डिआयएस-2009/प्र.क्र.435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 चे दरकर अट क्रमांक 12 नुसार 60 दिवसाच्या अवधीनंतर पुरवठा केलेल्या मालाच्या एकुण किंमतीच्या 0.05 टक्के प्रती आठवडानुसार विलंब शुल्क आकारणी रक्कम रुपये 94,721/- वसुली करण्यात आलेली नाही.

**3.717 जिल्हा परिषद उपकरातुन साथ रोग नियंत्रण अतंर्गत औषधी खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद ने जिल्हा परिषद उपकरातुन साथ रोग नियंत्रण अतंर्गत औषधी खरेदीवर रक्कम रुपये 3,82,382/- खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त आयुक्त्, पशुसवंर्धन विभाग, यांचे पत्र जा.क्र.डीडीडी/313/(भाग-2/49/2012-13/पसं-12 पुणे-1, दिंनाक 21/03/2013 अन्वये व्हेट इंडिया फार्मा. लि. हैद्राबाद यांचेशी दरकरार करण्यात आलेला आहे. सदरील दरकराराची मुदत दिनांक 30/06/2014 पर्यंत असून सदरील जिल्हा परिषद उपकरातुन साथ रोग नियंत्रण अतंर्गत औषधी खरेदीस दिलेल्या प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता विहित कालावधीत पूर्ण करून, औषधी खरेदीचे आदेश देणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2010/प्र.क्र.335/पदुम-4, दिनांक 09/08/2011 अन्वये दवाखान्याचा दर्जा व श्रेणी नुसार औषधी खरेदी करून वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली असल्याचे दिसून आले नाही.

3) अतिरिक्त आयुक्त्, पशुसवंर्धन विभाग यांचे पत्र जाक्र डीडीडी/326/1199/2014/पसं-12.औंध पुणे-7, दिनांक 25/11/2014 यांचे दरकरारातील अट क्रमांक 2 तसेच खात्याचे पत्र क्र.डीडीडी/305/334/पंस-12, दिनांक 25/03/2014 अन्वये सूची केल्यानुसार औषधाची गुणवत्ता तपासणी झाल्याची खात्री करुनच दर करारानुसार कंपनीस देयके अदा करण्यात यावी परंतु इंटरनॅशनल हेल्थ केअर लि. विजयवाडा यांचेकडून प्राप्त औषधीची गुणवत्ता तपासणी न करताच देयकाचे प्रदान केले असल्याचे दिसून आले. उपरोक्त त्रुटींची पुर्तता होई पावेतो खर्च रक्कम रुपये 6,82,382/- तात्पुरता आक्षेपाधीन ठेवण्यात येतो.

**3.718 जिल्हा परिषद उपकरातुन शेळया मेंढयांना लस पुरवठा योजनेतील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबादने जिल्हा परिषद उपकरातून खालील प्रमाणकाव्दारे शेळया मेंढयांना लस पुरवठा योजनेवर रक्कम रुपये 9,72,858/- खर्च नोदंविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, जिपिआर/1988/सीआर/79630, दिंनांक 26/06/1989 अन्वये ज्या वित्तीय वर्षात औषधी खरेदी केलेली आहेत. त्याच वर्षात विनियोग घेतलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन कृषी विभाग, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय डीआयएस/1023/प्रक्र 118/पदम-4, दिंनाक 26/11/2008 अन्वये औषधाची विहीत टक्केवारी प्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे त्या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

3) काबरा ड्रग्ज ली. इंदोर यांचेकडे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे पुरवठा आदेश क्रमांक 685, दिनांक 27/06/2014 अन्वये पुरवठा आदेश दिलेले असून आदेशा प्रमाणे दिनांक 27/08/2014 पर्यंत औषधीचा पुरवठा झालेला असल्याचे औषधी प्राप्तीचे पोच पावतीवर स्पष्ट उल्लेख केलेला दिसून आला नाही.

4) अतिरिक्त आयुक्त्, पशुसवंर्धन विभाग यांचे पत्र जा.क्र.डिडिडि/326/1529/2013/पस-12 पुणे-1, दिंनांक 15/05/2013 च्या दरकरारातील अट क्रमांक 12 नुसार मागणी नोंदविल्या पासून 60 दिवसाच्या आत औषधीचा पुरवठा केलेला नाही, तरी पुरवठा धारकाकडून 60 दिवसापेक्षा आधिकच्या कालावधी करिता औषधी किंमतीचे 0.5 टक्के प्रती आठवडा विलंब शुल्क आकारून त्या रकमेची कपाती नंतरच देयकाची रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे.

**3.719 कामधेनु दत्तक ग्राम योजने अंतर्गत नोंदविलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद ने सन 2014-2015 मध्ये जिल्हा वार्षिक योजना कामधेनु दत्तक ग्राम योजना अतंर्गत रक्कम रुपये 43,53,671/- खर्च नोंदविलेला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन कृषि, पशु.दुग्ध व्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ना पु यो-2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 नुसार कामधेनु दत्तक ग्राम योजना मध्ये दत्तक ग्रामची निवड सदर ग्राममध्ये पैदा सक्षम गाई/म्हशींची संख्या किमान 300 असावी. कामधेनु योजनेची माहीती कामधेनु दत्तक गावातील ग्रामसभेत दिली असल्याची माहिती दर्शविली नाही.

2) औषधांच्या गुणवत्ते बाबत चाचणी अहवाल घेतल्या शिवाय देयकाची रक्कम देण्यात येऊ नये, वरील देयकाची तपासणीत इंडियन जीओमिक्स, सॅफकॉन लाइफ रुद्रपुर व समर इंडिया लखनऊ यांचे गुणवत्ता तपासणी प्रमाणपत्र घेतलेले नाही, नियमांचे पालन झालेले नाही.

3) उपरोक्त प्रमाणे गोचीड-गोमांशा निर्मुलन, वंध्यत्व निवारण, जंतनाशक, जीवनसत्व व खनिज द्रव्य क्षारमिश्रण या करीता खर्च नोंदवुन सबंधित दत्तक ग्रामातील शेतकरी / पशुपालकाच्या आर्थिक, सामाजिक उन्नती बाबत अहवाल घेण्यात यावा.

### 3.720 विशेष घटक योजने अंतर्गत दुभत्या जनावरांना खाद्य वाटप करण्यातील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात प्रमाणक क्रमांक 744 व 233 अन्वये रुपये 19,68,251/- खर्च दुभत्या जनावरांना खाद्य वाटपावर खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र./446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना अंमलबजावणी वेळापत्रकाप्रमाणे झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 1089 /प्र.क्र./55/34 दिनांक 05/10/1989 अन्वये मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिले बाबत लेखापरिक्षणात समजु शकले नाही.

3) खरेदीची प्रक्रिया ई-टेंडरिंग पध्दतीने केलेली नाही

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 26/01/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात खरेदी केली त्याच वर्षात त्याचा विनियोग करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 21 प्रमाणे साहित्याची रक्कम अदा करताना पुरवठादाराची पोच घेणे आवश्यक आहे, परंतु पोच घेतलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय जिवायो 2011/प्र.क्र./305/पदुम 04 दिनांक 22/11/2011 मधील अट 09 अन्वये एका कुंटुबांतील एकास लाभ देण्याच्या सुचना आहेत. परंतु एकाच कुटुंबातील दोन दोन लाभार्थींना लाभ दिला आहे.

### 3.721 विशेष घटक योजना दुभत्या जनावरांचे गट वाटपाबाबत.

**जिल्हा परिषद बीड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद बीड सन 2014-2015 मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत दुभत्या जनावरांचे गट वाटपावर रक्कम रुपये 12,47,000/- इतका खर्च नोंदविला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/ वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार वेळापत्रकानुसार योजना राबविणे आवश्यक आहे. परंतु सदरची योजना मार्च अखेर राबविण्यात आलेली आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास /1084/सीआर/1633 दिनांक 19/01/1985 अन्वये प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करणे आवश्यक असतांना लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल न करता अनुदान मंजुरी दिलेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 1098 /प्र.क्र./78/34 दिनांक 20/10/1989 अन्वये लाभधारकास दुबार लाभ मिळू नये म्हणून मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, परंतु नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे प्रदानाची पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो/2011/प्र.क्र./305/पदुम-4 दिनांक 22/11/2011 अन्वये योजनेसाठी लाभार्थीची निवड झाल्यावर लाभार्थीनी एक महिन्याच्या कालावधीत लाभार्थी हिस्सा रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक आहे, परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो/2011/प्र.क्र./305/पदुम-4 दिनांक 22/11/2011 अट क्रमांक 09 अन्वये एका कुटुंबातील एकास लाभ देण्याच्या सुचना असतांना उपरोक्त परिच्छेदातील 4+4=08 लाभार्थी एकाच कुटुंबातील असुन त्या 4 लाभार्थ्यांना वितरीत केलेले अनुदान 63000*4=25200 वसुल पात्र ठरते.

6) विशेष घटक योजना लाभार्थी यांना जनावरे खरेदी केल्यानंतर दर तीन महिन्यांनी पडताळणी करणे व पशुधन विकास अधिकारी यांनी दर 03 महिन्यांनी जनावरांचा पडताळणी अहवाल जिल्हा परिषदेला देणे व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सहआयुक्त यांना किमान 10 टक्के जनावरांची पडताळणी करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

### 3.722 गाव तेथे खोडा योजनाअंतर्गत औजारे व हत्यारे खरेदीमधील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत गाव तेथे खोडा योजनाअंतर्गत औजारे व हत्यारे खरेदीमध्ये रक्कम रूपये 1,99,780/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी साहित्य खरेदी करण्यापुर्वी तालुकानिहाय व दवाखाना निहाय किती मागणी आहे या बाबतचे अहवाल संचिकेत नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 नुसार पुरवठादारास साहित्य पुरवठा बाबत रक्कम प्राप्त झाल्याची पोचपावती लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार प्रत्यक्ष देण्यात आलेली पुरवठा देयक दुबार वापरली जाऊ नये म्हणून ती विरुपीत केली पाहिजे परंतु विरुपीत केलेले नाही.

### 3.723 केंद्रपुरुस्कृत योजनेतून लाळखुरकूत रोगमुक्त करण्यासाठी पशुऔषधी व साहित्य खरेदीतील अनियमितताबाबत.

**जिल्हा परिषद परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, परभणी चे सन 2014-15 चे लेखापरीक्षण अंतर्गत लाळ खुरकुत रोगमुक्त करण्यासाठी केलेल्या औषध खरेदी अंतर्गत रक्कम रूपये 9,99,246/- खर्च नोंदविला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजनेअंतर्गत राज्यातील एकुण गायवर्गीय व म्हैसवर्गीय पशुधनच्या 90 टक्के पशुधनास लाळखुरकत रोगप्रतिबंधक लसीकरण करावयाचे आहे. लसीकरणाचे जिल्हानिहायि उद्दिष्ट पुर्ण झालेली अभिलेखे लेखापरीक्षणात उपलब्ध करण्यात आली नाहीत.

2) केंद्र शासनाकडुन लसमात्रांचा पुरवठा झाल्यानंतर लसीकरण कार्यक्रम दिनांक 10/10/2014 व दिनांक 10/04/2015 ते 30/04/2015 या दरम्यान संपुर्ण महाराष्ट्रभर एकाचवेळी व उपरोक्त 21 दिवसाच्या कालावधीत पुर्ण करण्यात यावा मात्र असे केल्याचे आढळुन आले नाही.

3) लसीकरणाचा दैनंदिन अहवाल सोबत दिलेल्या प्रपत्रात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांना दुस-या दिवशी सादर केला नाही.

4) लसीकरणाची फेरी पुर्ण झाल्यानंतर लसीकरणाचा अंतीम अहवाल प्रादेशिक सहआयुक्त यांनी सोबत दिलेल्या प्रपत्रात (प्रपत्र ड) फेरी समाप्तीनंतर 10 दिवसात सादर केला नाही.

5) लसीकरणाच्या रोग अन्वेषण विभागामार्फत निर्देशित गावामधील प्रत्येक गावामधुन 10 गायी व 10 म्हशीचे लसीकरणापुर्वीचे रक्त जल नमुने या प्रमाणे प्रती जिल्हा 200 रक्त जल नमुने आणी लसीकरणानंतरच्या 30 व्या दिवशीचे प्रती जिल्हा 200 रक्त जल नमुने लाळ खुरकत प्रतिपिंड मापन पातळीसाठी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशु वैद्यकिय सर्व चिकित्सालय यांनी सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे यांना पाठविणे बंधनकारक आहे. उपरोक्त बाबत एफएमडी-सीपी/2014-15/302/201/2014/पुणे-7/पसं-12, दिनांक 07/02/2015 प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रंमाक झेडपीए-2008/प्र.क्रं.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणाऱ्या योजनेसाठी वेळापत्रक नुसार योजनेस दिनांक 30 जूनपर्यंत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजूरी देणे व दिनांक 30 नोव्हेंबर अखेर साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. परंतु साहित्य खरेदी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मार्च-2015 पर्यंत केलेले असून प्रत्यक्ष साहित्य जिल्हा अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना यांनी मार्च नंतर वापर केलेले आहे. त्यामुळे हे वेळापत्रक पाळलेले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार साहित्य खरेदी बाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी गुणवत्ता प्रमाणपत्र दिलेले नाही.

8) साहीत्य खरेदी बाबत नोटीस बोर्डवर लावलेल्या नोटीस नुसार दरपत्रके स्थानिक भागातुन प्राप्त न होता पुणे येथुन प्राप्त झालेली आहेत. प्राप्त दरपत्रकावर दिनांक व संदर्भ नमुद नाहीत.

9) पशुसंवर्धन विभागात प्राप्त औषधी व साहीत्य प्राप्त झाले बाबत डिलेव्हरी चालान न दर्शविल्यामुळे विहीत मुदतीतच औषधी व साहीत्य प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 नुसार पुरवठादारास साहीत्य/औषधी पुरवठाबाबत रक्कम प्राप्त झाल्याची पोचपावती लेखापरीक्षणास दर्शविली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 नुसार प्रत्यक्ष देण्यात आलेली पुरवठा देयक दुबार वापरली जाऊ नये म्हणून ती विरुपीत केली पाहिजे परंतु विरुपीत केलेले नाही.

**3.724 जयवंत ठोंबे खरेदीतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीने सन 2014-2015 चे लेखा परीक्षणात जयवंत ठोंबे खरेदीवर जिल्हा परिषद उपकरातून रूपये 8,50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागाने कोणतीही रुपरेषा न ठरविल्याने वार्षिक विकास योजनेसाठी पशुसंवर्धन आयुक्तालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना जा.क्र.वैवि/क-15/1487-1559/2014/पंस-14, दिनांक 11/06/2014 नुसार कार्यवाही करणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1076/प्र.क्र.872/ जल 2 ब,दिनांक 10/10/1996 अन्वये सर्व पंचायत समिती अंतर्गत असलेल्या दवाखान्याच्या कार्यकक्षेतील लाभार्थ्यांची मागणी दर्शविली नाही. त्यामुळे मागणीप्रमाणेच खरेदी झाल्याची खात्री करता आलेली नाही.

3) पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक 11/06/2014 मधील परिच्छेद क्रमांक 7 मधील नमुद अ ते ई बाबींसाठी आदेशित केल्याप्रमाणे अभिलेखे ठेवलेले नाहीत.

4) मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद 8 नुसार योजनेचा लाभ देण्यापूर्वी लाभार्थीस योजनेची माहिती व पिक लागवडबाबत प्रशिक्षण दिल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

5) जिल्हयातील तालुका अंतर्गत दवाखान्याला परस्पर पुरवठा केलेला असुन डिलेव्हरी चालानवर स्टोअर किपर यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 83(3) प्रमाणे खरेदी पुर्वी विभाग प्रमुखाने साहित्याची गुणवत्ता व दर्जा याबाबत पडताळणी केलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 21 खरेदी साहित्याची रक्कम मिळालेबाबत संबंधीत पुरवठादाराची पोंचपावती घेतली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत नसल्याने योजनेचा उद्देश्य सफल झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

**3.725 पशुवैदयकीय दवाखान्याला औषध पुरविणेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये जिल्हा वार्षीक योजनेअंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्यास औषध पुरविण्यासाठी नमुद प्रमाणकान्वये रक्कम रूपये 1,99,305/- चा खर्च नोंदविलेला आहे. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी 1081/सीआर1940/34,दिनांक 14/06/1982 अन्वये माल पुरवठा धारकाकडून पूरवठा होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढले जाणार नाहीत याची दक्षता न घेता साहित्य प्राप्त होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढण्यात आला.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय निर्णय क्रमांक डीआयएस/2009/प्रस435/पदम-4,दिनांक 05/03/2010 चे परिच्छेद क्रमांक 13 मध्ये नमुद केल्यानुसार सदरील औषध खरेदीसाठी जिल्हयातील पशुवैदयकीय संस्थाकडील औषधाबाबतचे मागणीपत्र संचिकेत नाही.

3) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दरकरार दिनांक 25/11/2014 मधील अट क्रमांक 8 नुसार चांगल्या स्थितीतील पार्सल कार्यालय प्रमुखाने स्वत:च्या उपस्थितीत व दोन अधीकाऱ्यांच्या समक्ष फोडुन मागणीप्रमाणे औषधे असल्याबबत खात्री केल्याचे दर्शविले नाही.

4) परिच्छेदातील प्रमाणकान्वये औषधी खरेदी केलेल्या औषधी डिलेव्हरी चालन व गुणवत्ता चाचणी अहवाल संचिकेत नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा हेतू सफल होत आहे किंवा नाही याबाबत सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसुन आलेला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 83(3) अन्वये साहित्य खरेदी करणेपुर्वी तपासणी करुन योग्य व गुणवत्तापुर्ण औषधी असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 91 प्रमाणे कार्यालय प्रमुखानी साहित्याची तपासणी करुन साठा व विनियोग बरोबर असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 21 प्रमाणे प्रदान केलेल्या रक्कमा बाबत संबंधीत पुरवठादाराच्या रक्कमा प्राप्त झाल्याच्या पोचपावत्या घेतल्या नाहीत.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर108/सीआर/ 792/30, दिनांक 26/10/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात औषधी खरेदी केली त्याच वर्षात विनियोग करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

10) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र जा.क्र.डीडीडी-360/1211/2013/पसं-12, दिनांक 30/10/2013 मधील F औषधींचा वापर मधील परिच्छेद क्रमांक 25 नुसार मागणी नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखाण्यातील औषधींच्या उपयोगाची व साठ्याची तपासणी दर 3 महिन्यांनी करणे आणि दिनांक 05/03/2010 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 22 प्रमाणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.726 कामधेनु दत्तक ग्रामयोजनेअंतर्गत दवाखान्याला औषध खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोलीने सन 2014-2015 मध्ये कामधेनु दत्तक ग्रामयोजनेअंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्यास औषध पुरविण्यासाठी नमुद प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 8,37,948/- चा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी1081/सीआर1940/34, दिनांक 14/06/1982 अन्वये माल पुरवठा धारकाकडून पुरवठा होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढले जाणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक असताना साहित्य प्राप्त होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढण्यात आला आहे. अशा प्रकरणात दोषी असणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांच्या विरुध्द कडक कार्यवाही करण्याबाबत आदेश आहेत.

2) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र दिनांक 25/11/2014 दरकरारातील योजनेच्या अटी व शर्ती पुर्ण झाल्याची खात्री विभागाने केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डीआयएस/2009/प्रस435/पदम-4, दिनांक 05/03/2010 चे परिच्छेद क्रमांक 13 व 18 अन्वये तपासणी शासकीय प्रयोगशाळेमार्फत करणे अनिवार्य असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

4) कामधेनु दत्तक ग्रामयोजनेच्या अंमलबजावणी करिता वार्षिक संदर्भ आराखडयामध्ये (01 ते 17) मध्ये नमुद केल्यानुसार कार्यक्रम आखुन त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करणे आवश्यक असताना त्याबाबत अभिलेखे दर्शविले नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 83(3) अन्वये साहीत्य खरेदी करणेपुर्वी तपासणी केल्याचा अहवाल दर्शविला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर108/सीआर/ 792/30, दिनांक 26/10/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात औषधी खरेदी केली त्याच वर्षात विनियोग करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

7) पुरवठादाराकडुन प्रत्यक्षात औषधी कधी प्राप्त झाले याबाबत डिलेव्हरी चालन दर्शविले नाही. तसेच औषधी वाटपावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 21 प्रमाणे प्रदान केलेल्या रक्कमाबाबत संबंधीत पुरवठादारास रक्कमा प्राप्त झाल्याच्या पोचपावत्या घेतल्या नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 91 प्रमाणे कार्यालय प्रमुखानी साहित्याची तपासणी करुन साठा व विनियोग बरोबर असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा हेतु सफल होत आहे किंवा नाही याबाबत सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसुन आलेला नाही.

11) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र जा.क्र.डीडीडी-360/1211/2013/पसं-12, दिनांक 30/10/2013 मधील F औषधींचा वापर मधील परिच्छेद क्रमांक 25 नुसार मागणी नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखाण्यातील औषधींच्या उपयोगाची व साठ्याची तपासणी दर 3 महिन्यांनी करणे आणि दिनांक 05/03/2010 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 22 प्रमाणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.727 पशुवैदयकीय दवाखान्याला औषधी पुरवठा करणे मधील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांनी सन 2014-2015 मध्ये जिल्हा वार्षीक योजनेअंतर्गत पशुवैदयकीय दवाखाण्यास औषध पुरविणेसाठी नमुद प्रमाणकान्वये रक्कम रूपये 4,12,063/- चा खर्च नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डीआयएस/2009/प्रस435/पदम-4, दिनांक 05/03/2010 चे परिच्छेद क्रमांक 13 मध्ये नमुद केल्यानुसार सदरील औषध खरेदीसाठी जिल्हयातील पशुवैदयकीय संस्थांकडील मागणीपत्र सादर केल्याचे संचिकेत नसल्याने गरजेशिवाय खरेदीची शक्यता नाकारता येत नाही.

2) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दरकरार दिनांक 05/12/2014 मधील अट क्रमांक 8 नुसार चांगल्या स्थितीतील पार्सल कार्यालय प्रमुखाने स्वत:च्या उपस्थितीत व दोन अधिका-यांच्या समक्ष फोडुन मागणी प्रमाणे औषधी असल्याबबत खात्री केल्याचे दर्शविले नाही.

3) औषधी खरेदी केलेल्या औषधीचे डिलेव्हरी चालन व गुणवत्ता चाचणी अहवाल संचिकेत आढळुन आले नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 83(3) अन्वये औषधी खरेदी करणेपुर्वी तपासणी करुन योग्य व गुणवत्तापुर्ण असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 91 प्रमाणे कार्यालय प्रमुखानी साहित्याची तपासणी करुन साठा व विनियोग बरोबर असल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 21 प्रमाणे प्रदान केलेल्या रक्कमा बाबत संबंधीत पुरवठादाराच्या रक्कमा प्राप्त झाल्याच्या पोचपावत्या घेतल्या नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमाक पीआरसी-1093/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये जिल्हा परिषदेने घेतलेल्या योजना राबवितांना योजनेचा हेतू सफल होत आहे किंवा नाही याबाबत सविस्तर पाहणी अहवाल संचिकेत दिसुन आलेला नाही.

8) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र जा.क्र. डीडीडी-360/1211/2013/पसं-12, दिनांक 30/10/2013 मधील F औषधींचा वापर मधील परिच्छेद क्रमांक 25 नुसार मागणी नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखाण्यातील औषधींच्या उपयोगाची व साठ्याची तपासणी दर 3 महिन्यांनी करणे आणि दिनांक 05/03/2010 च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक 22 प्रमाणे अनिवार्य असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी1081/सीआर1940/34, दिनांक 14/06/1982 अन्वये माल पुरवठा धारकाकडून पुरवठा होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढले जाणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक असताना साहित्य प्राप्त होण्यापुर्वी पुरवठा धारकाचे नावे धनादेश काढण्यात आला. अशा प्रकरणात दोषी असणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांच्या विरुध्द कडक कार्यवाही करण्याबाबत आदेश आहेत.

### 3.728 पशुवैदयकीय दवाखान्याला औषधी पुरवठा करणेबाबत.

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सन 2014-2015 या कालावधीचे पशुसंवधन विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे लेखापरिक्षणात रूपये 2,21,442/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डी.आय.एस.-102003/13592/प्र.क्र.88/पदूम-4,दिनांक 26/11/2008 अन्वये औषधी विहित केलेल्या टक्केवारीप्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे.

2) औषधी खरेदी करण्यापूर्वी पुरवठादाराकडून हमीपत्र (करारनामा) करून घेणे बंधनकारक आहे. करारनामा केल्याचे दिसून आले नाही.

3) औषधी खरेदी करण्यापूर्वी पशुवैदयकीय दवाखाने उपकेन्द्र यांचेकडून मागणीपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र. 12139/34 दिनांक 01/01/1990 अन्वये ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले आहे. त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक असतांना औषध पुढील वर्षात वाटप केलेले दिसून येते.

5) औषधाचा / साहित्याचा विनियोग दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही केली नाही.

**3.729 अनुदान निर्धारण न करणेबाबत.**

**जिल्हा परीषद नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड सन 2014-2015 चे लेखापरीक्षणास विभागाची अनुदान निर्धारणाचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. सबब कोणत्या वित्तीय वर्षापर्यंतचे अनुदान निर्धारणाचे प्रस्ताव संचालक, पशुसंवर्धन विभाग यांचेकडे सादर केले आहे व त्यास मंजूरी प्राप्त करून शासनाची अखर्चित रक्कमेचा भरणा केला आहे किंवा करावयाचा आहे याबाबत काहीही ताळमेळ घेता आला नाही.

2) तरी अनुदान निर्धारण अदयावत वर्षापर्यंत करून त्यानुसार अखर्चित रक्कमेबाबत योग्य कार्यवाही करावी.

**3.730 पशुवैद्यकीय दवाखान्यास औषधी पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद लातूर विभागाने सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद उपकर अंतर्गत पशुवैद्यकीय संस्थाना औषधी खरेदीपोटी रक्कम रुपये 4,85,970/- एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 व 87 नुसार शासकीय प्रयोग शाळेतून गुणवत्ता बाबत चाचणी अहवाल प्राप्त केलेला नाही. त्यामुळे खरेदी केलेले औषधीचा दर्जा व गुणवत्ता याबाबत पडताळणी करता आली नाही. मा.अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन यांचे पत्र क्रमांक 326/2014/पं.स.-12,दिनांक 25/11/2014 मधील अट क्रमांक 13 व 14 चे पालन झालेले नाही. सदर औषधी खरेदीचे प्रदान नियमबाहय झाल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

2) औषधी खरेदी संचिकेत पुरवठा चलने व प्रत्यक्ष साहित्याचा पुरवठा दिनांक 31/03/2015 अखेर विहित मुदतीत पुरवठा केल्याबाबत खात्री करता आली नाही.

3) शासन निर्णय, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक डीवाय-209/ प्र.क्र.435/पदु-4,दिनांक 05/03/2010 अन्वये पशुवैद्यकीय संस्थेची मागणी अहवाल व शासन निर्णयातील अनुक्रमांक 22 नुसार पुरवठा केलेल्या औषधाच्या वापराबाबतचा तिमाही अहवाल घेण्यात आलेला नाही. तसे अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 98 आणि आणि Hospital Manual Vol. I Chapter 26 Para 18 नुसार भांडारातील साठयाची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही.

5) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मागास-1093/प्र.क्र.12139/34,दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षातील खरेदी केलेली आहे त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

6) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए-2001/प्र.क्र.4023/33, दिनांक 12/01/2001 च्या टिप 1 नुसार विषय समितीच्या पुढील सभेत सदरील मान्यता अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 प्रमाणे शिल्लक साठा व विनियोजन प्रमाणपत्र तसेच शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक ग्रावि/पीआरसी-1083/सीआर-1074/578,दिनांक 02/07/1993 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना घेण्यात आलेले नाही.